cmyk



दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
www.epaper.rajyaloktantra.com
email:rajyaloktantra75@gmail.com

घटस्थापना
नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१६६ | सोमवार, दि.७ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# सोयाबीनसाठी गेल्यावर्षीपेक्षा २१२ रुपयांनी अधिक हमीभाव

## खरेदी केंद्रांची संख्या आणखी वाढणार

**पुणे । प्रतिनिधी**

**आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सोयाबीनचा हमीभाव हा ४,८९२ रुपये इतका असून, तो गेल्यावर्षीपेक्षा २९२ रुपयांनी अधिक आहे. सोयाबीन खरेदीसाठी केंद्रही सुरु करण्यात आले असून, त्याची संख्या आणखी वाढवणार असल्याचे राज्य सरकारच्या वतीने सांगण्यात आले आहे.**

राज्यात सन २०२४-२५ मधील खरीप हंगामातील सोयाबीनची मोठ्या प्रमाणात पेरणी झाली आहे. केंद्र शासनाने सन २०२४-२५ साठी सोयाबीन करिता प्रति क्विंटल रू.४,८९२/- इतका हमीभाव घोषित केला आहे. सदर दर मागील सन २०२३-२४ या वर्षाच्या हमीभावापेक्षा रू.२९२/- प्रति क्विंटल इतका जास्त आहे. महाराष्ट्र राज्यातील खरीप हंगामातील सोयाबीन पिकाची केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात खरेदी सुरू



करण्यासाठी केंद्रशासनातील नाफेड व एन.सी.सी.एफ. तसेच राज्यातील सर्व प्रमुख नोडल एजन्सीची राज्यस्तरीय आढावा बैठक पार पडली. सदर बैठकीमधील चर्चेनुसार हंगाम २०२४-२५ मध्ये राज्यात केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानुसार नाफेड व एनसीसीएफ मार्फत प्रथमतः महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई व विदर्भ पणन महासंघ नागपुर यांच्या वतीने राज्यात सोयाबीन खरेदीकरीता शेतकरी नोंदणी १ ऑक्टोबर पासून सुरु करण्यात आली आहेत. सर्व शेतकरी बांधवांनी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभुत दरानुसार सोयाबीन खरेदी योजनेचा लाभ घ्यावा. सदरील योजना ही शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा याकरीता राबविण्यात येत आहे. त्यामुळे सर्व शेतकरी बांधवांनी सोयाबीन विक्रीकरीता आपल्या नाफेड/एनसीसीएफ च्या नजिकच्या खरेदी केंद्रावर ◀◀ पान २ वर

### सद्या २४२ खरेदी केंद्र कार्यान्वित

केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या नाफेड व एनसीसीएफ या दोन्ही नोडल एजेन्सी सोबत संयुक्तपणे चर्चा करून सोयाबीन खरेदीकरीता राज्यात जिल्ह्यांची विभागणी करुन नाफेड व एन.सी.सी.एफ. कार्यालयाने २६ जिल्ह्यांतील एकूण २५६ खरेदी केंद्रांना सोयाबीन खरेदीची मंजुरी देण्यात आली असून, त्यापैकी २४२ खरेदी केंद्र कार्यान्वित झालेली आहेत. कार्यन्वित झालेल्या खरेदी केंद्रामार्फत निश्चित केलेल्या कालावधीत किमान आधारभूत किमतीवर सोयाबीन खरेदी लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

# जिपच्या आवारात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

### खिशात मिळाली मराठा आरक्षण मिळत नाही म्हणून जिवन संपवत असल्याची चिठ्ठी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेच्या आवारात एका लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन शहरातील अंकुश नगर भागातील अर्जुन कवठेकर या तरुणाने गळफास घेतल्याची घटना रविवारी दि.६ रोजी सकाळी उघडकीस आली. हा तरुण महाराजा ट्रॅव्हल्सवर चालक पदावर काम करत असल्याचे बोलले जात असून, मराठा आरक्षण मिळत नाही म्हणून आत्महत्या केली असल्याची एक चिठ्ठी त्याच्या खिशात सापडल्याने खळबळ माजली आहे.**

बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ असलेल्या जिल्हा परिषद आवारातील एका लिंबाच्या झाडाला एका तरुणांने आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. दि.६ ऑक्टोबर रोजी सकाळी काही नागरिकांच्या ही बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांना कळवली. पोलिसांनी चौकशी केली असता हा तरुण अंकुश नगर ◀◀ पान २ वर

### सरकार मराठ्यांचा अंत पाहत आहे- जरांगे पाटील

या घटनेनंतर मनोज जरांगे पाटील यांनी कवठेकर कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की, सरकार मराठ्यांचा अंत पाहत आहे. आरक्षण मिळत नाही म्हणून समाजातील तरुण आत्महत्या करत आहेत सरकारने आता समाजाचा अंत पाहू नये, नसता याचे परिणाम भोगावे लागतील असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

# समुद्रात शिवस्मारक होणार नसेल तर तसे जाहिर करा!

### संभाजीराजे यांचा सवाल, स्वराज्य पक्षातर्फे शोध शिवस्मारकाचा अभियान

**मुंबई । प्रतिनिधी**

**स्वराज्य पक्षाचे संस्थापक तथा भाजपा पुरस्कृत माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी रविवारी शोध शिवस्मारकाचा अभियानातंर्गत दक्षिण मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे आंदोलनाची भूमिका घेत पक्षाच्या कार्यकर्त्यांना संबोधित केले. यावेळी आम्ही काही आंदोलन करण्यासाठी आलेलो नाही. त्यामुळे पोलिसांनी कार्यकर्त्यांना अटक करू नये असे आवाहन संभाजी राजे यांनी करत फक्त आम्ही अरबी समुद्रातील शिवाजी महाराजांचे स्मारक**



**कुठे आहे याचा शोध घेण्यासाठी आलो असल्याचे सांगत आम्हाला स्मारकाचा शोध घ्यायचा असल्याचे सांगितले. दरम्यान, अरबी समुद्रातील स्मारक राज्य सरकारकडून उभारले जाणार आहे का की नाही याविषयीची माहिती राज्य सरकारनेच जाहिररित्या सांगावे असे आव्हान दिले.** ◀◀ पान २ वर

# भाजपा आणि फडणवीस कधी माफी मागणार?

### नाना पटोले यांचा खोचक सवाल, काँग्रेसच्या शक्ती अभियानाला सुरूवात

**मुंबई । प्रतिनिधीं**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंडित नेहरुंनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल केलेल्या लिखाणाचा मुद्दा उपस्थित करुन राहुल गांधींनी माफी मागावी अशी मागणी केली. देवेंद्र फडणवीस यांचा अभ्यास कच्चा आहे. पंडित जवाहरलाल नेहरु यांनी तुरुंगात शिक्षा भोगत असताना जे लिखाण केले त्याची नंतर माहिती घेऊन दुरुस्ती केली व माफी सुद्धा मागितली. भाजपा शिवाजी महाराजांचा वापर केवळ मते मिळवण्यासाठी करत असते. मालवणमध्ये महाराजांचा पुतळा कोसळून अवमान केला, कोट्यवधी शिवप्रेमींच्या मनाला वेदना झाल्या पण अद्याप देवेंद्र फडणवीस यांनी माफी मागितली नाही, फडणवीस केंव्हा माफी मागणार? असा सवाल केला आहे.**



टिळक भवन येथे 'शक्ती अभियानाचा' शुभारंभ केल्यानंतर पत्रकारांशी बोलताना नाना पटोले बोलत होते. ते म्हणाले, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा' असा नारा दिला, त्याच आधारावर राहुल गांधी यांनी आयर्न लेडी इंदिरा गांधींच्या नावाने राजकारणात महिला सशक्तीकरणासाठी ◀◀ पान २ वर

## माळ पाचवी



पंचमीचे दिवशीं व्रत
तें उपांगललिता हो ।
अर्घ्यपाद्यपूजनें तुजला
भवानी स्तविती हो ।
रात्रीचे समयीं करिती
जागरण हरिकथा हो ।।
आनंदें प्रेम तें आलें
सद्भावें क्रीडतां हो ।। ५ ।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।।

# निखळ मनोरंजनातून महिलांचे आत्मभान जागविण्यासाठी 'न्यू होम मिनिस्टर' कार्यक्रमाचे आयोजन

### कार्यक्रमास जास्तीत जास्त महिलांनी उपस्थित राहावे-डॉ.ज्योती मेटे

**बीड । प्रतिनिधी**

**शिवसंग्रामच्या वतीने नवरात्र उत्सवात ''जागर मातृ शक्तीचा'' हे अभियान राबवण्यात येणार आहे. यानिमित्त नवरात्र काळात संबंध महाराष्ट्रत महिलांमध्ये प्रचंड लोकप्रिय असणारा ''होम मिनिस्टर'' (खेळ रंगला पैठणीचा) हा भव्य कार्यक्रम दि. ०७ ऑक्टोबर रोजी दुपारी ११ वा. आशीर्वाद मंगल कार्यालय, बार्शी रोड, बीड येथे ''जागर मातृशक्तीचा'' या कार्यक्रमांतर्गत निखळ मनोरंजनातून महिलांचे आत्मभान जागविण्यासाठी आमचा एक छोटासा प्रयत्न म्हणून ''न्यू होम मिनिस्टर'' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे आणि या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिलांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांनी केले आहे.**



भारतीय संस्कृतीमध्ये स्त्री ही पूजनीय आहे, याला अनेक शतकांची परंपरा आहे. पूजनीय असतानाच ''गार्गी, मैत्रेयी'' सारख्या स्त्रिया देखील भारतीय संस्कृतीमध्ये होऊन गेलेल्या आहेत. सृष्टीची जननी असणाऱ्या स्त्रियांनी वेगवेगळ्या कालखंडामध्ये महान सामाजिक कार्य करीत स्वतःला सिद्ध केले आहे. जिजाऊ माँसाहेब, राजमाता अहिल्यादेवी होळकर, महाराणी ताराराणी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, झाशीची राणी, माता रमाई, ◀◀ पान २ वर

# २८३ वैद्यकीय अधिकाऱ्यांना ऑनलाईन नियुक्तीचे आदेश प्रदान

### मंत्री प्रा.डॉ.तानाजी सावंत यांच्या पुढाकाराने पारदर्शकपणे पदभरती

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा अंतर्गत वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गातील २८३ पदांसाठी पदभरती प्रक्रिया राबविण्यात आली. यासाठी बीएएमएस शैक्षणिक पात्रता प्राप्त उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात आले होते. याबाबत ३१ जानेवारी २०२४ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर परीक्षेचा निकाल आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला असून २८३ उमेदवारांना ऑनलाईन ◀◀ पान २ वर



# उद्या बीडमध्ये खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांचा विधानसभा संवाद दौरा मेळावा

### शिवसैनिकांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहावे- जगताप, मुळूक

**बीड । प्रतिनिधी**

विधानसभा सभा निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या असताना आचार संहिता लागू होण्या अगोदर शिवसेना नेते संसदरत्न खासदार मा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांचा येत्या मंगळवारी दि. ८ ऑक्टोबर रोजी दुपारी १२.०० वाजता शहरातील आशीर्वाद मंगल कार्यलय बार्शी रोड येथे बीड विधानसभा संवाद दौरा मेळावा होणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी दिली आहे. यासंदर्भात दोन दिवसांपूर्वीच शिवसेना उप नेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मेळाव्याच्या पूर्व तयारी साठीची बैठक देखील पार पडली. या बैठकीमध्ये अर्जुनजी खोतकर साहेब यांनी खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब बीड मतदार संघात पहिल्यांदा येत असून त्यांच्या विधानसभा संवाद दौरा मेळाव्या बाबत महत्वपूर्ण सूचना मार्गदर्शन केले. त्यांनी केलेल्या सूचनेनुसार बीड शिवसेना महिला आघाडी, युवासेना, सर्व अंगीकृत संघटनेचे आजी- माजी पदाधिकारी- ◀◀ पान २ वर



# माजीमंत्री धस यांच्या प्रयत्नातून तालुक्यात ४५ कोटी ९२ लाख रूपये कामांचा शुभारंभ



**आष्टी । प्रतिनिधी**

**माजीमंत्री सुरेश धस यांच्या माध्यमातून आष्टी मतदारसंघात विविध विकास कामांचा धुमधडाका सुरू असून, सोमवार (दि.७)रोजी तालुक्यातील बेलगांव, मच्छिंद्रनाथ गड व गंगादेवी याठिकाणी सुमारे ४५ कोटी ९२ लक्ष रूपये विकासकामांचे भूमिपूजन माजीमंत्री सुरेश धस यांच्याहस्ते होणार आहे.**

आष्टी मतदारसंघात माजीमंत्री सुरेश धस यांच्या माध्यमातून शासन दरबारातून मोठ्या प्रमाणावर निधी खेचून आणला आहे.आज सोमवार (दि.७)रोजी बेलगांव येथे सकाळी ९ वा.१२ कोटी ३१ लक्ष ,वनवेवाडी,नागतळा दुपारी १२.३० वा.१२ कोटी तर दुपारी १.३० वा. मच्छिंद्रनाथ गड येथे २० कोटी ३५ लक्ष रूपये,आणि गंगादेवी ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड,दि.०५ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.०० क्विंटल | २,६३६ | ३,२५० | २,९७८ |
| ज्वारी/हायब्रिड :६४.०० क्विंटल | २,०५० | २,४०१ | २,२१० |
| मूग : २.५० क्विंटल | ६,४०० | ६,८५१ | ६,६२५ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : ३३.५० क्विंटल | ६,५०१ | ७,६०० | ७,०६७ |
| बाजरी : ८.०० क्विंटल | २,२६४ | २,६६१ | २,४६१ |
| मुग : ११.०० क्विंटल | ६,७०० | ७,३०० | ६,९६३ |
| सोयाबीन: ६६८.०० क्विंटल | ३,१०१ | ४,३२० | ३,८०१ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |

# ९८ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. तारा भवाळकर

पुणे : नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीच्या ज्येष्ठ अभ्यासिका डॉ. तारा भवाळकर यांची निवड करण्यात आली आहे. येत्या फेब्रुवारीमध्ये संमेलन होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. दि.२१ ते २३ फेब्रुवारी २०२५ रोजी दिल्ली येथील ताल कटोरा स्टेडियम ◀◀ पान २ वर







cmyk

अग्रलेख

# प्रशांत किशोरांची विचारधारा गुलदस्त्यातच !

प्रशांत किशोर ऊर्फ पीके आता निवडणुकीच्या रिंगणातच उतरणार आहेत. मार्गदर्शकाच्या भूमिकेतून बाहेर पडत त्यांना स्वत:लाच सत्ता राबवायची आहे. कोणतेही यश आणि अपयश प्रयोग करणार्याच्या महत्त्वाकांक्षेवर आणि प्रामाणिक प्रयत्नांवर अवलंबून असते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंडित नेहरू यांच्या लोकप्रियतेच्या काळात फारसे प्रयोग झाले नाहीत. अर्थात, नेहरू सत्तास्थानी असतानाही त्यांच्याच सोबत असणार्या काही सहकार्यांनी नंतर वैचारिक मतभेदानंतर वेगवेगळ्या भूमिका स्वीकारल्या. नेहरूंच्या नंतर मात्र वैचारिक मतभेदांतून हळूहळू संघर्ष आकाराला येऊ लागला आणि त्यामुळे नेहरू व महात्मा गांधी यांनी ज्या काँग्रेसला लोकांच्या घरात, हृदयात पोहोचवले होते त्या काँग्रेसच्या बदलत्या अवताराला जाहीर आव्हाने दिली गेली. सत्तरच्या दशकात याची सुरुवात झाली आणि त्याचा प्रवास आताच्या प्रशांत किशोर यांच्यापर्यंत येऊन पोहोचला. साधारण दर दहा-पंधरा वर्षांनी भारतात नवे राजकीय वादळ उदयाला येत गेले आणि त्यामुळे सत्तांतरे घडत गेली. सरकार बदलाच्या या खेळाचा सगळ्यांत मोठा फटका काँग्रेसला बसला.

प्रशांत किशोर यांच्यासारखाच प्रयोग साधारण दीड ते दोन दशकांपूर्वी राजधानी दिल्लीतच झाला. त्यातून आम आदमी पार्टी नावाचा पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांच्यासारखा महत्त्वाकांक्षी नेता उदयाला आला. केजरीवालांच्या पक्षाला दशकापेक्षा जास्त काळ झाला असला, तरी राजकारणात हा कालावधी अगदीच रांगण्याचा काळ असतो. त्यामुळे त्या प्रयोगात पुढे काय होणार याची उत्तरे अद्याप अनुत्तरित असतानाच प्रशांत किशोर यांनी स्वत:च प्रवाहात उतरण्याचे ठरवले आहे. आपल्या राजकीय इनिंगसाठी त्यांनी बिहारची निवड केली. कारण या राज्याच्या जनतेची मनातली आणि तोंडातली दोन्ही भाषा ते बोलतात. बिहारबाबत असे म्हटले जाते की येथील अल्पशिक्षित माणसालाही त्याच्या गावातील पंचायत आणि चौपालपासून जगातल्या राजकारणाची आणि घटनांची बित्तंबातमी असते. त्यांचे वाचन एकवेळ कमी असेल मात्र संचार चौफेर असतो आणि कान उघडे असतात. त्या अर्थाने देशातील राजकीयदृष्ट्या डॉक्टरेट प्राप्त झालेले हे राज्य आहे. नव्या प्रयोगाला ते कधीच ना म्हणत नाहीत. इंदिरा गांधी यांच्या कथित एककल्ली कारभाराला ब्रेक लावण्याची हाक बिहारमधील नेत्यानेच बिहारच्याच भूमीतून दिली. महात्मा गांधी यांनीही दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आल्यानंतर देशव्यापी दौरा केल्यानंतर ब्रिटिशांविरूद्ध पहिला राजकीय संघर्ष येथूनच सुरू केला. बिहारची निवड करण्यामागे प्रशांत किशोर यांनी हाही विचार केला असणार. स्वातंत्र्यप्राप्तीपासून ज्या निवडणुका लढल्या गेल्या त्या मुख्यत: विचारधारेच्या आधारावरच. सुरुवातीच्या काळात विचारांशी असलेली बांधिलकी सात्विक होती. नंतर त्यात भेसळ होत गेली आणि राजकारणातील प्रदूषणही वाढत गेले. भिन्न विचारधारा मांडून लोक निवडणुकीच्या समरात उतरू लागले. लढा विचारधारांचाच असल्याचे भासवले जायचे, मात्र अंतिमत: सर्व लढती केवळ सत्ताप्राप्तीसाठीच असायच्या. जाहीरनामे आणि भाषणांतील राजकीय पक्षांची भाषा वेगळी आणि सत्ताप्राप्तीसाठी केलेली कृती वेगळीच. प्रशांत किशोर यांनाही याचा अंदाज आला होता. राजकीय पक्षांचे झाकलेले हेच स्वरूप त्यांनी उघड करून दाखवले. एकाच वेळी त्यांनी वेगवेगळ्या राज्यांत वेगवेगळ्या पक्षांसाठी काम करायला सुरुवात केली आणि विशेष म्हणजे बहुतांश वेळी त्यांनी ज्या पक्षाचे काम हाती घेतले आहे त्या पक्षाला एकतर सत्ता राखण्यात यश मिळाले किंवा सत्ता प्राप्त करण्यात यश मिळाले. नरेंद्र मोदी यांची देशात आलेली २०१४ मधील सत्ता हे याचे ठळक उदाहरण. नंतर त्यांचे मोदी आणि त्यांचे सहकारी अमित शहा अथवा एकूणच भाजपच्या रणनीतिज्ज्ञांशी बिनसले असावे. त्यांनी चंद्राबाबू नायडू, नितीश कुमार, ममता बॅनर्जी, काँग्रेस आणि इतरही काही पक्षांना रणनीती आखून दिली. प्रशांत किशोर यांची ही भिन्न विचारधारांच्या पक्षांशी असलेली जवळीक कोणत्याही राजकीय पक्षाला खटकली नाही, हे विशेष. स्वत: प्रशांत किशोरही कोणत्याही राजकीय विचारधारेला अस्पृश्य न मानता त्यांचे काम स्वीकारत गेले आणि स्वत:च्या नावावर गोल करत गेले. त्यातून त्यांनी नकळतपणे भारतीय लोकशाहीवर आणि येथील मतदारांवर एक मोठे उपकार केले. त्यांनी आपल्या या कार्यपद्धतीमुळे हे सिद्ध करून दाखवले की भारतात राजकारण हा एक पेशा आहे आणि सत्ताप्रप्ती हेच त्याचे लक्ष्य आहे. विचारधारेचा त्याच्याशी काही संबंध नाही. ते स्वत: आता त्याच मार्गाने जात आहेत. त्यांची विचारधारा गुलदस्त्यातच आहे. तथापि, समाजातील वंचित घटकांच्या मनातील भाषा ते बोलू लागले आहेत. ज्या राज्यात त्यांना इनिंग सुरू करायची होती तेथे त्यांनी जवळपास अडीच ते तीन वर्षे भ्रमंती केली आहे. त्यातून ते स्वत:च्या पक्षासाठी वेगळी रणनीती तयार करण्यात निश्चितच यशस्वी झाले असणार आहेत. पण खरा प्रश्न पुढे येणार आहे; केवळ सत्ता मिळवणे हेच त्यांना अपेक्षित आहे की भारतीय राजकारणातील दशा आणि दिशा त्यांना बदलायची आहे. हे पाण्यासाठी थोडे थांबावे लागेल.

# मा.आ.जेथलिया यांनी मतदार संघातील हजारो मतदारांची आळंदीत जाऊन घेतली भेट

**परतूर । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मंठा, नेर, सेवली, परतूर मतदार संघातील पुणे, देहू परिसरात कामानिमित्त गेलेल्या हजारो मतदारांची मा आ सुरेशकुमार जेथलिया यांनी आळंदी येथे स्नेह मिलानाचा कार्यक्रम आयोजित करत भेट घेतली.**

यावेळी त्यांच्या सह नितीन जेथलिया,परतूर काँग्रेस तालूका अध्यक्ष बाबासाहेब गाडगे,मंठा तालुका अध्यक्ष,नीलकंठ वायाळ,अण्णासाहेब खंदारे , किसनराव मोरे, गणेश महाराज आवजी, सुधीर भाऊ मुंगसे, सुखलाल राठोड, संतोष पवार, दत्तप्रसाद बनसोडे, बाबुराव हिवाळे,इंद्रजीत घनवट, विष्णुपंत बोराडे, माऊली तनपुरे, माऊली वायाळ, सूर्यभानजी मोरे, निळकंठ तौर, सिद्धेश्वर सोळंके, प्रफुल्ल शिंदे, रमेश जाधव, विष्णुपंत वायाळ ,विनायक बाहेकर ,अण्णासाहेब चव्हाण, राजेश भुजबळ, अविनाश शहाणे,रहेमु कुरेशी,अकबर शेठ, मजूळदास सोळंके, प्रविण डुकरे,बाबुराव दुगाने,पंजाब देशमुख, शाकीर भाई, गौतम सदावर्ते,आसाराम चोरमारे, दादाराव हिवाळे, दामोदर कदम, श्रीकांत महाराज, अवचार ,विवेक घारे, चैतन्य भैया वाघमारे, अंकुश महाराज पाटोदा ,लहू महाराज हातवन, नितीन महाराज, माऊली महाराज शिवनगिरी लक्ष्मण महाराज आंबोडा ,शुभम महाराज मंठा ,मंगेश महाराज नांद्रा प्रल्हाद महाराज कदम, ज्ञानेश्वर महाराज, कदम दिलीपराव पवार, उद्योजक पांगरी सिद्धेश्वर आंभुरे, सुरेश जिजा सवणे, महादेव घेंबड, गजानन ढाकणे,सुरेश तुरेराव, दिगंबर इंगळे, सुहास राठोड, दत्ता अंभूरे , भगवान आघाव यांच्या सह अनेक मान्यवाराची



उपस्तिथी होती. आपल्या मतदार संघातील नेता आपल्याला भेटायला पुणे परिसरात आला या उच्छुकतेने या परिसरातील परतूर मतदार संघातील मतदार भराऊन गेले. आज दिनांक ०६ रोजी आळंदी येथील फ्रुटवला ट्रस्ट येथे संपन्न झालेल्या या मेळाव्यात हजारोच्या संख्येने मतदारांची उपस्तिथी होती. यावेळी मतदाराना आहवन करताना मा आ सुरेशकुमार जेथलिया यांनी म्हटले कि आपल्या मतदार संघातील हजारो लोक पुणे, मुंबई, नाशिक सह मोठ्या शहरात गेलेले आहेत. यात काही नोकरीं निम्मित गेले हरकत नाही पण बरेच मतदारांनी केवळ पोटाची खळगी भरण्यासाठी आपली कर्म भूमी सोडली यांचे खरंच दुःख वाटते. कारण परतूर मतदार संघात खऱ्या अर्थाने विकास झाला नाही. नागरिकांच्या मूलभूत गरजा पुरवण्यात सरकार व सत्ताधारी व्यवस्ता अपयशी पडत आहे. म्हणून ग्रामीन माणसाचा लोंढा मोठा संख्येने आपले गाव सोडण्यात मजबूर होतांना दिसत असल्याची वास्त्याविकता त्यांनी स्पष्ट केली. हे समीकरण बदल्यासाठीच तर यावेळी राज्यातील सरकारला जनतेनेच धडा शिकवण्यांचा निर्णय घेतला असल्याचे ते म्हणाले. मला संधी दया मी आपल्या मतदार संघातील विकास खऱ्या अर्थाने करून दाखवेल अशी ग्वाही देत याच आळंदीत आपण विजयी मेळावा साजरा करू अशा भावना त्यांनी शेवटी व्यक्त केल्या. दरम्यान यावेळी येथील मतदारांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले कि आजवर एवढ्या दूर येऊन आपल्या मतदार संघातील नेत्याने कधीच भेट घेऊन अस्तेने विचार पूस केली नाही मात्र मा आ सुरेशकुमार जेथलिया यांनी आमची भेट घेतली याबद्दल ते किती जागृत नेते आहेत हे स्पष्ट होते. तुम्ही कामाला लागा आमची तुम्हाला साथ आहे. या घोषनेने कार्यक्रम स्थळ दनाणून गेले होते. यावेळी अनेकांनी आपल्या मनोगतात जेथलिया यांच्या कार्याचा व त्यांच्या कार्यकाळात झालेल्या विकासकामाचा उल्लेख केला.

# शेतकऱ्यांच्या मुलांकरिता वस्तीगृहाचा लोकार्पण सोहळा व शेतकरी मेळावा

**जालना । प्रतिनिधी**

कृषि उत्पन्न बाजार समिती, जालनाचे बाजार आवारा ०६ ऑक्टोंबर रोजी शेतक-यांच्या मुलांकरिता वस्तीगृहाचा लोकार्पण सोहळा तसेच शेतकरी मेळावा संपन्न झाला. यावेळी जालना जिल्ह्यातील ०६ शेतक-यांना मा. राज्यपाल यांच्या हस्ते कृषि क्षेत्रातील विविध पुरस्कार देण्यांत आले त्यांना सदर शेतकरी मेळाव्या मध्ये पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देवुन बाजार समितीचे मुख्य प्रशासक तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी त्यांचा सत्कार केला यागध्ये वसंतराय नाईक शेती मित्र या पुरस्काराने सन्मानित करण्यांत आलेले शेतकरी श्री. श्रीकृष्ण नामदेव डोंगरे रा.बाजीउम्रद , रामेश्वर उबाळे, उदलसिंग चुंगडे , श्रीमती सुचिता सिनगारे , रामदास बारगाजे या प्रसंगी सत्कार करण्यांत आला. यावेळी बोलतांना बाजार समितीचे मुख्य प्रशासक मा. श्री. अर्जुनराव खोतकर यांनी बाजार समितीच्या शेतमाल तारण कर्ज योजने मध्ये शेतक-यानी आपला शेतमाल ठेवुन या योजनांचा शेतक-यांनी फायदा घेतला पाहिजे तसेच बाजार समितीमध्ये होत असलेल्या सोयाबीनची आवक मोठ्या प्रमाणावर होत असुन आलेल्या सोयाबीनचे पेमेंट एका दिवसामध्ये शेतक-यांना देयुन व्यापारी, हमाल, मापाडी हे सर्व शेतमालाची दैनंदिन प्रक्रिया पार पाडतात याचे त्यांनी यावेळी कौतुक करुन कुठल्याही प्रकारची



तक्रार होवु देत नसल्या बाबत त्यांनी बाजार समिती प्रशासनाचे देखील कौतुक त्यांनी यावेळी केले. या वेळी त्यांनी शासनाच्या विविध योजनेवर उजाळा टाकत शासन राबवत असलेल्या विविध योजना कश्या फायदेशीर आहे याचे त्यांनी यावेळी महत्व पटवून दिले.

या प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. भाऊसाहेब घुगे, बाजार समितीचे प्रशासकीय मंडळाचे सर्व श्री. संतोष मोहिते, विष्णू पाचफुले, राहुल गवारे, सौ. कालिंदा ढगे, तुकाराम खरजुले, नरगिंग गोरे, ज्ञानेश्वर शेजुळ, संदिप बाघ, माजी संचालक, बाबा मोरे, प्रल्हाद खेडेकर, कमलाकर कळकुंबे, गोपाल काबलिये, यांच्या सह शेतकरी संघटनेचे साबळे, ख.वि. संघाचे अच्युत कदम, माजी.पं.स. सभापती पांडुरंग डोंगरे, जिजाबाई जाधव सेवली, उज्वला फोफलिया, शुभम टेकाळे, सुधाकर वाडेकर, बाळु पाचरणे, ब्रम्हा याध, रविंद्र ढगे, जनार्धन चौधरी, वैजिनाथ कावले, सोपान कावले, रामेश्वर पडुळ, निवृती साबळे, गणेश भुतेकर, विश्वलराय म्हस्के, व्यापारी अनिल सोनी, सतीष पंच, अशोक अग्रवाल, कैलास गिरी, कैलास जगताप, गोविंद सराटे, नंदु अग्रवाल, अनिल पंच, गणेश गोरे, विष्णू चेचाणी, विरेंद्र रुणवाल, सुनिल गोयल, शाम गोरकर, अरुण तापडीया, निवृत्ती पाचफुले, राजु ओस्तवाल, रामेश्वर बोडखे, हमीद खान, संजय कानडे, कैलास टिळेकर, अशोक पाचफुले, सुरेश याबळे. बाजार समितीचे सचिव मोहन राठोड, सहा. सचिव अनिल खंडाळे, भगवान शिंदे, भरत तनपुरे, लेखापाल अजय मिरकड, अभियंता हार्दिक फलके, अशोक कोल्हे, निरिक्षक शिवानंद पालवे, प्रसाद काकडे, संजय जाधव, यांच्या सह अनिल कुदाळे, राजु हिवाळे, नंदकिशोर गव्हाणे, भगवान अंभोरे, ज्ञानेश्वर आघुडे, संजय मोठे, संकल्प गाडेकर, विश्वभर गिरी, रामेश्वर बांडे, सुनिल साबळे, आदित्य कुलकर्णी यांच्यासह मोठ्या प्रमाणावर शेतकरी, व्यापारी यांच्या सह इतर बाजार घटकांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

# भक्ताच्या हाकेला धावणारे श्रीक्षेत्र गुगळादेवी देवस्थान

**बीड तालुक्यातील मौजे ईट येथील श्री क्षेत्र गुगळादेवी देवस्थान बालाघाट डोंगररांगाच्या पूर्व-पश्चिम पसरलेल्या उत्तरेकडील शेवटच्या रांगेवर पूर्वाभिमुख असलेले एक अप्रतिम हेमाडपंती मंदिर एका निवांत निसर्ग सौंदर्य लाभलेल्या भागात वसलेले आहे.**

बीड या जिल्ह्याच्या ठिकाणापासून अवघ्या २० की.मी.अंतरावर असलेले हे मंदिर खरोखरच एक शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना असून हे मंदिर एक संशोधनाचा विषय आहे. ग्रामीण भागातील प्रेक्षणीय स्थळ नेहमीच विकासापासून वंचित राहत असली तरी यावर्षी मात्र ग्रामस्थ आणि भाविक भक्ताच्या लोकवर्गणीच्या मदतीने मंदिर परिसरातील विविध कामे तसेच शिखराच्या सजवटीसह संपुर्ण परिसराची रंगरंगोटी करून रुपडे पालटण्याचा प्रयत्न झाला आहे.

मुंबई-पुण्यापासून शेकडो मैलावर असणारी परंतु त्या त्या शहराला जोडली गेली असल्यामुळे तेथील स्थळाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले असते. याउलट जिल्ह्यातील अनेक प्रेक्षणीय स्थळ गैरसोयीच्या अंधारात वर्षानुवर्ष पडून असतात. या स्थळांना पाहिजे त्या प्रमाणात



न्याय मिळत नाही की तेथे साधी एसटी बसची सुविधा देखील उपलब्ध होत नाही. बीड-पिंपळनेर-नाथापूर-कुक्कडगाव-रंजेगाव-केसापुरी परभणी आदि गाड्याने ईट फाट्यावर उतरल्यानंतर अंदाजे दोन किलोमीटर पायी किंवा खाजगी प्रवासी वाहतुकीने गेल्यानंतर आपण मंदिराच्या पायथ्याशी पोहोचतो.

पुरातन पद्धतीच्या पायऱ्यांना नवीन विकसित करून बांधकाम असलेल्या सुमारे १०० पायऱ्या चढून गेल्यानंतर पूर्वाभिमुख दगडी दरवाजातून आत गेल्यावर उत्तराभिमुख भव्य १६ खांबी दगडी सभा मंडप असलेले मंदिर आहे. हे सर्व खांब अखंड दगडाचे एक एक अशी असून मंदिरालाही १६ कोण आहेत. सभा मंडपात प्रवेश करताच समोर विघ्नहर्ता गणेशाची मुष्कारुड मूर्ती दिसते. अशा प्रकारची उंदीरावर बसलेली गणेशाची मूर्ती याठिकाणी दिसते,बहुतेक ठिकाणी उंदीर हा समोर लहानशा आकारात असतो.

मंदिर प्रवेशानंतर प्रथम पहावयास मिळतो तो भव्य असा दगडी नगारखाना.देवीच्या गाभाऱ्यात प्रवेश प्रामुख्याने एका छोट्याशा दगडी प्रवेशद्वारातून नतमस्तक होऊन करावा लागतो. मातापुर (माहूर)चे हे ठाणे असल्यामुळे इतरत्र असणाऱ्या शेंदूर लावलेल्या भव्य-दिव्य मूर्ती सारखीच एका नक्षीदार तीन फुटी चौरस दगडी चौरंगावर विराजमान झालेली भव्य मूर्ती पाहावयास मिळते.

देवीचे दर्शन घेऊन बाहेर आल्यानंतर स्मरणात राहणारी बाब म्हणजे मंदिराचे दगडी बांधकाम व त्याची आकर्षक सजावट. पूर्व पश्चिम असा डोंगर उत्तरेकडील मजबूत चिरेबंदी भिंत.यामध्येच मंदिराची सुरक्षितता आहे.तटास दोन भक्कम बुरुज असून मधोमध दीपमाळ आहे जी देवीच्या समोरा समोर येते. पुरानामध्ये पुराण कथेनुसार याच दीपमाळेवर दीप लावून गंगेकाठापर्यंतचा परतीचा प्रवास करत.

मंदिराच्या पूर्वेस पडझड झालेल्या अवस्थेत एक गायवडा होता ज्याची स्वच्छता करून भव्य अशी मोकळी जागा तयार केली असून त्यामध्ये देवीच्या साधकांच्या समाधी आहे. त्यातील एक समाधी तर चमत्कारच दाखवून देते.त्या समाधी जवळ एक भले मोठे लिंबाचे झाड आहे.त्यातील जी एक फांदी त्या समाधीवर आहे त्या फांदीचा पाला गोड लागतो बाकी त्या सर्व झाडाच्या फांद्याचा पाला हा लिंबाच्या गुणधर्मासारखा कडूच लागतो.त्यामुळे याला कोणी श्रद्धा म्हणा किंवा अंधश्रद्धा परंतु ते एक सत्यच आहे.

मंदिराच्या परिसरात तीन भुयारे असून त्याची लांबी व शेवट अध्यापपर्यंत कोणालाही समजू शकलेला नाही.पश्चिमेकडे नजर टाकल्यास दूरवर तलावाचे विहंगम निसर्ग सौंदर्य पहावयास मिळते.त्याबरोबरच मंदिराच्या उत्तरेकडील भागात लावलेली झाडे मंदिर परिसराची शोभा आणखीनच वाढवतात.



श्री क्षेत्र गुळादेवी देवस्थानचे नाव हे प्रामुख्याने पुरातन काळी त्या परिसरात गुगळाच्या विविध वेली मोठ्या प्रमाणात होत्या. ज्या वेलीला स्पर्श केल्यानंतर किंवा कुठल्याही आजाराला त्याचा रस लावल्यानंतर आजार बरा होत होता अशी आख्यायिका सांगितली जाते.त्यामुळे देवीचे नाव हे गुगळादेवी असे प्रचलित झाले.

**लक्ष्मण नरनाळे**
**ईट,बीड,मो.९४२२७४३७७७**

पंचक्रोशीतील भाविक भक्ताचे गुगळादेवी देवस्थान हे श्रध्दास्थान आहे.देवीचे नित्याने साजरे करण्यात येणारे उत्सव हे साधारणतः चैत्र पौर्णिमेला यात्रा उत्सव व शारदीय नवरात्र महोत्सव आदि उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात.पंचक्रोशीतील भाविकांची या देवस्थानावर श्रद्धा असल्यामुळे नव वधू-वर देवीचे दर्शन घेऊनच आपल्या वैवाहिक जीवनाची सुरुवात करतात.

श्री क्षेत्र गुळादेवी या देवस्थानाला तीर्थक्षेत्र योजने अंतर्गत ''क''वर्गीय दर्जा प्राप्त असून या माध्यमातून विविध विकास कामे करण्यात आली .भाविक तसेच ग्रास्थाच्या मदतीने शिखर बांधकामासह सभामंडप आणी मंदिर परिसरातील फरशी काम,रंगकाम, पायऱ्यावर ग्रील बसवणे आदी कामे केली आहे.

येथे येणाऱ्या भाविक भक्तांची गैरसोय खराब रस्त्यामुळे होताना पहावयास मिळते.प्रामुख्याने गाव तिथे रस्ता,वीज, पाणी आणि एसटी या शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी झाली तर निश्चितच अशी प्रेक्षणीय स्थळ विकास पासून वंचित राहणार नाहीत.

## पान १वरून...

### सोयाबीनसाठी गेल्यावर्षीपेक्षा

जावून ७/१२ उतारा, आधारकार्ड व बँकेचे पासबुक घेवून प्रथम आपल्या पिकाची नोंदणी करुन घ्यावी व विक्री व्यवस्थापनाचे चांगल्या प्रकारे नियोजन व्हावे या दृष्टीने आपणास एसएमएस प्राप्त झाल्यानंतर सोयाबीन विक्रीसाठी खरेदी केंद्रावर घेवून यावा असे सूचित केलेले आहे. तसेच आजपर्यंत सुमारे ५००० शेतकरी बांधवांनी सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी केलेली असून याबाबत महाराष्ट्र राज्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी सदरील योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन राज्य शासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

----------

### भाजपा आणि फडणवीस

महत्वाचे पाऊल उचलले आहे. इंदिरा गांधी फेलोशिपअंतर्गत महिला सशक्तीकरणासाठी 'शक्ती अभियान' सुरु करण्यात आले असून महाराष्ट्रात या अभियानाची सुरुवात आजपासून करण्यात येत असल्याची माहिती काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिली. एक वर्षापूर्वी सुरु केलेल्या शक्ती अभियानाला राज्यातून चांगला प्रतिसाद मिळाला असून प्रदेश काँग्रेस हे अभियान मोठ्या ताकदीने राबवणार आहे. या अभियानात महाराष्ट्रातील आयेशा खान, अनुष्का वानखडे, रोहिणी धोत्रे, विजया दुर्धवळे, मीना धोदडे यांनी सहभाग घेऊन उत्तम कामगिरी केली आहे. हे अभियान जिल्हा, तालुका, ब्लॉक स्तरावर राबवले जाणार आहे. महिला नेतृत्व पुढे आले पाहिजे यासाठी हे अभियान सुरु करण्यात आले आहे. सोनिया गांधी यांच्या पुढाकाराने काँग्रेसने महिला आरक्षण विधेयक आणले त्यावेळी याच भाजपाने त्याला विरोध केला होता पण मोदी सरकारने ते विधेयक पुन्हा आणले असता काँग्रेसने मात्र त्याला पाठिंबा दिला. पण मोदी सरकारने फक्त विधेयक मंजूर केले आरक्षणाची अंमलबाजवणी केली नाही कधी करणार तेही सांगितले नाही. काँग्रेस पक्ष मात्र सरकार आल्याबरोबर महिला आरक्षणाची अंमलबजावणी करेल असे आश्वासनही यावेळी त्यांनी दिले. भाजपाला छत्रपती शिवाजी महाराजांचा विचारच मान्य नाही. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला त्यावेळी याच पेशवाईवृत्तीने विरोध केला होता आणि आजही त्याच पेशवाई विचाराचे राज्य महाराष्ट्रातही आहे. शिवाजी महाराजांचे विचार हीच प्रवृत्ती संपवत आहे. २०१९ मध्ये स्वयंभू विश्वगुरु, पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते व देवेंद्र फडणवीस त्यांच्यासोबत अरबी समुद्रातील शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे जलपूजन करण्यात आले, त्याचे काय झाले? याचे उत्तर फडणवीस यांनी द्यावे अशी मागणीही यावेळी केली.

--------------

### समुद्रात शिवस्मारक होणार

गेट वे जवळ जमा झालेल्या मराठा समाजाच्या समर्थक आणि स्वराज्य पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोर बोलताना संभाजीराजे म्हणाले की, राज्य सरकारने अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणी संदर्भात मोठ्या थाटात घोषणा केली होती. त्यासाठी कोट्यावधी रूपयांचा निधीही मंजूरही केला होता. तर समुद्रातील पाण्याचे पूजनही पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. असे असतानाही शिवस्मारक अरबी समुद्रात का उभारण्यात आले नाही असा सवाल राज्य सरकारला करत या शिवस्मारकासाठी तरतूद केलेल्या निधीचा वापर राज्यातील ग़ड-किल्ल्यांवर किती खर्च केला असा सवालही यावेळी त्यांनी केला. पुढे बोलताना संभाजीराजे म्हणाले की, अरबी समुद्रातील स्मारक कधी होणार आहे याबाबत राज्य सरकारने अद्याप तरी जाहिर केले नाही. त्यामुळे अरबी समुद्रातील स्मारक राज्य सरकारकडून उभारले जाणार आहे का की नाही याविषयीची माहिती राज्य सरकारनेच जाहिररित्या सांगावे अशी मागणीही यावेळी त्यांनी केली. यावेळी संभाजी राजे यांनी त्यांच्या पक्षाच्या निवडक ५० कार्यकर्त्यांच्या टीमला सोबत घेऊन समुद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जलपूजन केलेल्या शिवस्मारकाच्या परिसराजवळ जात समुद्रातील जागेची पाहणी केली. तसेच समुद्रातील त्या जागेचे ठिकाणाची पाहणीही त्यांनी केली.

-----------

### जीपच्या आवारात तरुणाच

भागातील अर्जुन कवठेकर हा असून तो महाराजा ट्रॅव्हल्सवर चालक या पदावर काम करत असल्याचे समारे आले आहे. त्याच्या खिशात सापडलेल्या चिठ्ठीवर मराठ्यांना आरक्षण मिळत नाही, म्हणून आत्महत्या करत असल्याचे लिहिले असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकाराने बीड शहरांमध्ये खळबळ माजली आहे.

---------

### उद्या बीडमध्ये खा.डॉ श्रीकांत

लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या उत्साहाने कामाला लागले असून डॉ श्रीकांत शिंदे यांचा विधानसभा संवाद दौरा मेळावा अत्यंत शिस्तीत आणि नियोजनबद्ध पार पडेल असे बीड शिवसेनेच्या वतीने सांगण्यात आले असून बीड जिल्ह्यातील सर्व शिवसैनिकांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

-----------

### निखळ मनोरंजनातून महिलांचे

फातिमा शेख यांचे ऐतिहासिक कार्य काळाच्या पटलावर कोरले गेलेले आहे. भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर नानाविध क्षेत्रामध्ये महिलांनी उत्तुंग भरारी घेतले असल्याचे आपणास दिसते. नोकरी व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षण हा महाराष्ट्रातील महिलांसाठी मैलाचा दगड ठरणाऱ्या बाबी आहेत. तथापि यात ग्रामीण भागातील महिलांनी देखील अग्रेसर राहणे आवश्यक आहे. सामाजिक जाणीव प्रगल्भ करण्याबरोबरच महिलांच्या सशक्तीकी करण्यासाठी लोकनेते विनायकराव मेटे त्यांनी शिवसंग्रामच्या माध्यमातून अविरत प्रयत्न केले आहेत.लोकनेते विनायकराव मेटे साहेबांच्या अकाली निधनानंतर त्यांचे अपुरे कार्य पुढे चालू ठेवण्याचा आम्ही निरंतर प्रयत्न करीत असून, त्याचाच एक भाग म्हणून नवरात्रोत्सवा दरम्यान ''जागर मातृशक्तीचा'' या कार्यक्रमांतर्गत निखळ मनोरंजनातून महिलांचे आत्मभान जागविण्यासाठी आमचा एक छोटासा प्रयत्न म्हणून ''न्यू होम मिनिस्टर'' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानिमित्ताने महिलांचा वाढलेल्या सामाजिक वावर यामुळे त्यांना स्थानिक समस्या, समाजाचे प्रश्न याविषयीची त्यांची जाणीव वाढीस लागावी यामाध्यमातून अपणासर्वांना बीडचा विकास साधण्याची दूरदृष्टी मिळावी हेच अपेक्षा आहे. त्याचबरोबर कार्यक्रमा दिवशी महिलांना आर्थिक साक्षरतेबाबत माहिती देण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमास महिलांनी जास्तीत जास्त संख्येने आपला सहभाग नोंदवावा असे डॉ.ज्योती मेटे यांनी म्हंटले आहे.

------------

### माजीमंत्री सुरेश धस यांच्या

येथे सायंकाळी ५ वा.१ कोटी २६ लक्ष असे एकूण ४५ कोटी ९२ लक्ष रूपायांचे वरील ठिकाणी विविध विकास कामांचे भूमिपूजन माजीमंत्री सुरेश धस यांच्या हस्ते होणार आहे.तरी वरील ठिकाणी नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन गावातील सरपंच, पदाधिकारी यांनी केले आहे.

-----------

### ९८ व्या मराठी साहित्य संमेलनाच्या

येथे संमेलन होणार आहे. महामंडळ अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती सांगितली. तीन दिवसीय संमेलनात ग्रंथ दिंडी, ध्वजारोहण, ग्रंथ प्रदर्शन आणि संमेलन उद्घाटन होणार आहे. याखेरीज दोन कविसंमेलने आणि आठ परिसंवाद व प्रगट मुलाखत होणार आहे. कविसंमेलनात निमंत्रित आणि बहुभाषिक असे असणार आहेत. परिसंवादात विविध विषयांवर चर्चा होणार आहे. त्यात देशाचे राजकारण आणि मराठी साहित्य, मराठी आणि महाराष्ट्र धर्म, कृत्रिम बुद्धिमत्ता व सर्जनशीलता, मराठीचा अमराठी संसार, अशा विविध विषयांचा समावेश करण्यात आला आहे, असे त्यांनी नमूद केले आहे. महामंडळाच्या बैठकीसाठी पदाधिकारी उपस्थित होते.

-------------

### २८३ वैद्यकीय अधिकाऱ्यांना

नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आली आहेत. या भरतीसाठी प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने बीएएमएसच्या २८३ पदांसाठी एकूण २२,९८१ अर्ज ऑनलाईन पोर्टलद्वारे प्राप्त झाले. पदभरतीला उमेदवारांनी मोठया प्रमाणात प्रतिसाद दिल्यामुळे उमेदवारांची निवड करण्यासाठी आयबीपीएस संस्थेमार्फत दि. ०५ सप्टेंबर २०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने परिक्षा घेण्यात आली. सदर परिक्षेसाठी १८,७१५ उमेदवार उपस्थित होते. सदर ऑनलाईन परिक्षेचा निकाल दि.५ ऑक्टोंबर २०२४ रोजी जाहिर झाला असून, निवड केलेल्या २८३ उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या पुढाकाराने ही पदभरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली. नियुक्ती पत्र मिळाल्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

-------------

# पेपरला बातमी का छापली म्हणून पत्रकाराला शिवीगाळ

अंबड (प्रतिनिधी )अवैध गौण खनिज उत्खनन ची बातमी पेपर ला का छापली म्हणतं शेख फारुख यांना अश्लिल भाषेत शिवीगाळ करत धक्का बुक्की करून हातपाय तोडून जिवेमाण्याचा धमक्या दिली ङ्ग्याप्रकरणी कारवाई करण्यासाठी अंबड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांना निवेदन देण्यात आले. अंबड शहरातील एक व्यक्ती म्हणाला की पेपर ला बातमी का छापली म्हणतं अंबड तहसील कार्यालयाच्या आवारात अश्लील भाषेत शिवीगाळ करत धक्का बुक्की करून हातपाय तोडून जीवे मारण्याची धमकी दिली. पत्रकार हा निपक्ष व वास्तविक लिखाण करत असतानाही माफियान कडून जीवे मारण्याची धमकी देणे हे अत्यंत निषेधार्थ आहे. या घटनेचा जाहीर निषेध व्यक्त करत पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत संबंधित माफियावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. असे निवेदन देण्यात आले आहे



# पंचवीस वर्षीय मुकबधीर, मतीमंद मुलीवर चार मुलांनी केला बलात्कार

## दोन तासात दोन आरोपी जेरबंद, दोन फरार

म्हसोबावाडी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत गावामध्ये एका २५ वर्षीय मतीमंद, मुकबधीर मुलीवर चौघांनी बलात्कार केल्याची घटना शुक्रवार दि.४ रोजी उघडकीस आल्याने खळबळ उडाली. या संदर्भात अंभोरा पोलिस ठाण्यात चार जणांविरुध्द पोउपनि देवीदास सातव यांच्या फिर्यादीवरुन गुरनं-२४६/२०२४ कलम-६४ (२) (आय) (जे) ७० भारतीय न्याय संहितेप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अंभोरा पोलिसांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, शुक्रवार दि.४ रोजी सपोनि मंगेश साळवे यांना एका गावामध्ये २५ वर्षीय मतीमंद, मुकबधिर मुलीवर बलात्कार झाला असल्याची गोपनीय माहिती फोनवरुन मिळाली. त्या अनुषंगाने सपोनि साळवे यांनी गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ पोउपनि देवदास सातव, पोलिस अंमलदार सुदाम पोकळे यांना घटनास्थळी पाठवले, तेथून २५ वर्षीय मतीमंद, मुकबधीर मुलीसह तिच्या आईकडीलांना पोलिस ठाण्यात आणून त्यांना घडलेल्या घटनेची माहिती देऊन तक्रार नोंदवणेबाबत सांगीतले. मात्र पिडीतेच्या आईवडीलांनी तक्रार देण्यास नकार दिला. सदर घटनेची माहिती



सपोनि साळवे यांनी पोलीस अधिक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी कमलेश मिना यांना दिली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पिडीतेची तात्काळ बलात्काराच्या वारष्ठाच्या मागदशनाखाला पिडातचा तात्काळ बलात्काराच्या अनुषंगाने वैद्यकीय तपासणी करुन सरकार तर्फे पोउपनि देवीदास सातव यांच्या फिर्यादीवरुन अंभोरा पोलिसात चौघाच्या विरोधात गुरनं -२४६/२०२४ कलम-६४ (२) (आय) (जे) ७० भारतीय न्याय संहितेप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला सदरचा गुन्हा हा अत्यंत संवेदनशील गंभीर स्वरुपाचा असल्याने या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेऊन त्यांना गजाआड करण्यासाठी सपोनि साळवे, पोउपनि सातव, पोलिस हवालदार मुकूंद एकसिंगे, बाबुराव तांदळे, भरत माने, संतोष राठोड, मनोज खंडागळे, महिला पोलिस छाया साप्ते, पोना अमोल ढवळे, प्रशांत कांबळे, पोलिस अंमलदार शिवदास केदार, सतीश पैठणे, अमोल सिरसाठ, सुदाम पोकळे, चालक पडवळ यांनी तात्काळ आरोपींचा शोध घेऊन या गुन्ह्यातील दोघा जणांच्या अवघ्या दोनच तासातच मुसक्या आवळून गजाआड केले असून, उर्वरित फरार दोघांचा शोध घेण्यासाठी विशेष पोलिस पथक नेमण्यात आल्याचे सपोनि मंगेश साळवे यांनी सांगीतले.

अवघ्या दोन तासात तिघे नराधम गजाआड. अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये एका पंचवीस वर्षीय मतीमंद, मुकबधीर मुलीवर लैगीक अत्याचाराची घटना घडल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळताच, सपोनि मंगेश साळवे व त्यांच्या टिमने सदर गुन्ह्याची संवेदनशीलता व गांभीर्ण लक्षात घेऊन तात्काळ आरोपींच्या दिशेने तपासाची चक्रे फिरवून अवघ्या दोन तासात या गुन्ह्यातील चौघा आरोपींपैकी तिघांच्या मुसक्या आवळून गजाआड करण्याची किमया साधल्याने अंभोरा पोलिसांनी दाखवलेल्या कार्यतत्परतेचे नागरिकांमधून

# आ.लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश

**जालना । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीमध्ये जोरदार इन्कमिंग सुरू असून परतुर तालुक्यातील लिखित पिंपरी येथील काँग्रेस मधील अनेक कार्यकर्त्यांनी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या उपस्थितीमध्ये भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला

यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी बोलताना सांगितले की, मतदार संघाचा समतोल विकास करीत असताना आपण कधीच भेदभाव केला नसल्यामुळे नवनवीन कार्यकर्ते पक्षांमध्ये मोठ्या प्रमाणात येत असून संजय गांधी निराधार योजने पासून तर लाडकी बहीण पी एम किसान योजना, नानासाहेब देशमुख कृषी संजीवनी



योजनेच्या माध्यमातून मतदार संघातील अनेकांना वैयक्तिक लाभ मिळवून दिला असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

पुढे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की कार्यकर्ता हा पक्षाचा प्राण असून आज आलेल्या कार्यकर्त्यांची आपण मनापासून स्वागत करत असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले

लिखित पिंपरी येथील बाळू अण्णा सोळंके व अनिल राव सोळंके व अकोली येथील तुका आबा सोळंके यांच्या पुढाकाराने माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर साहेब व भाजपा प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत परमेश्वर अशोक भले कुणाल रावसाहेब सोळंके माजी सरपंच लिखित पिंपरी सोमेश्वर गायके गजानन भिसे ऋषिकेश सोळंके निळकंठ सोळंके गणेश सोळंके मधुकर भाले रामराव माने महादेव सोळंके राहुल सोळंके पवन सोळंके अण्णासाहेब राऊत खंडेश्वर शिंदे राहुल अच्युत सोळंके कचरू शिंदे अशा अनेक कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला यावेळी हरिभाऊ चौधरी भरतराव देशमुख रमेशराव कोरडे परमेश्वर सोळंके अशोकराव देशमुख बाबासाहेब चौधरी पांडुरंग मालगन शुभम सोळंके अतुल सोळंके विकासराव कदम बाळासाहेब चौधरी विष्णू दादा मालगन अशोकराव सोळंके रमाकांत सोळंके सोमेश्वर सोळंके रामराव शिंदे अशोक गिरी आसाराम चौधरी प्रतापराव सोळंके प्रभाकर राऊत शिवाजी मालगन प्रकाश भाले परमेश्वर चौधरी सुभाष कोरडे आदींची उपस्थिती होती.



# सकल मुस्लिम समाज गेवराईच्या वतीने पोलीस निरीक्षकांना निवेदन

गेवराई । प्रतिनिधी

दिनांक ५ ऑक्टोबर २०२४ शनिवारी गेवराई पोलीस ठाणे येथे सकल मुस्लिम समाज गेवराईच्या वतीने पोलीस निरीक्षक साहेब गेवराई यांना निवेदन देण्यात आले आहे, की नरसिंहानंद सरस्वती यांनी हिंदी भवन गाजियाबाद उत्तर प्रदेश या ठिकाणी सुरु असलेल्या एका कार्यक्रमात उपस्थित असलेल्या सर्व लोकांसमक्ष लाईव्ह प्रक्षेपण असतांना मुस्लिम समाजाची भावना दुखेल असा वक्तव्य केला होता. त्यांच्या वक्तव्यामुळे मुस्लिम समाजात रोष असुन समाजाचे भावना दुखावले आहे.

देशातील आणि राज्यातील कायदा व सुव्यवस्था चा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून नेहमी जातीय-धार्मिक तेढ वाढेल अशी प्रक्षोभक बेताल वक्तव्य तो जाणूनबुजून करत आहे. गेल्या दीड महिन्यापासून महाराष्ट्रात रामगिरी महाराज, नितेश राणे आणि आता नरसिंहानंद सरस्वती हे मुस्लिम समाजाला टार्गेट करत आहे, आणि समाजाची भावना दुखवेल असे वक्तव्य करत आहे. न्यायाच्या दृष्टीने नरसिंहानंद सरस्वती गुन्हा दाखल करण्यात यावं आणि कठोर कारवाई करण्यात यावी, आणि रामगिरी महाराज व आमदार नितेश राणे याला लवकरात लवकर अटक करण्यात यावा या मागणीचे निवेदन पोलीस निरीक्षक गेवराई यांना देण्यात आलं आहे.

# ईगलवुड म्हणजे इंग्रजी बरोबर भारतीय संस्कृती जपणारी शाळा-प्रा.पाठक

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरालगत असलेल्या फुले पिंपळगाव येथील ईगलवुड इंग्लिश स्कूलमध्ये शुक्रवार दि.४ ऑक्टोबर रोजी नवरात्री उत्सवानिमित्ताने सरस्वती गरबादीप-२०२४ हा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास डॉ.अर्चना पवार, अध्यक्षा, व्यंकटेश्वर मानव विकास मंडळ या अध्यक्षस्थानी होत्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक, संस्कार भारती देवगिरी प्रांताच्या अध्यक्षा प्रा.स्नेहल पाठक, दैनिक मराठवाडा साथीचे पत्रकार कुणाल दुगड, डॉ.धनश्री वांडेकर, पोलीस कॉन्स्टेबल आशा सांगळे, जयश्री गिरी, जयश्री कुलकर्णी, महिला उद्योजक निशा बेताला, प्रगतीशील महिला शेतकरी कविता नरवडे, शाळेचे मुख्याध्यापक सत्यजित सर,उपमुख्याध्यापिका प्रणिता मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेच्या प्रांगणात मान्यवरांचे विद्यार्थिनींनी औक्षण केले आणि सोहळ्याची सुरुवात करण्यात आली. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन झाले. सोहळ्याचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक सत्यजित सर यांनी केले. यावेळी स्त्री सुरक्षेसाठी आणि सन्मानाची प्रतिज्ञा सर्व विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी घेतली. सोहळ्यास विद्यार्थिनींनी विविध क्षेत्रातील नामवंत महिलांची वेशभूषा धारण करून त्यांच्या कार्याची माहिती सांगितली.

# जिल्ह्यात नगरपरिषद व नगरंपचायतमध्ये ६ नवीन लेखापाल; अंबडला भाऊसाहेब म्हसे रूजू

**जालना । शिवाजी मस्के**

नगर विकास विभागाने शासन निर्णयानुसार महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय (गट-क) संवर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यास सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना घोषित करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय संवर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सन २०२४-२५ मधील करावयाच्या बदल्यांबाबत, लगतचे वरिष्ठ प्राधिकारी म्हणून मा प्रधान सचिव, नवि-२, नगर विकास विभाग यांचेकडे वाचा क्र ५ अन्वये सादर केलेल्या बदली प्रस्तावास वाचा क्र ६ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.



महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ आणि वाचा क्र ३ व ४ मधील तरतुदी व प्राप्त अधिकारानुसार खाली नमूद महाराष्ट्र नगरपरिषद राज्यस्तरीय (गट-क) संवर्ग कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येत असून, त्यांची रकाना क्र ५ मध्ये दर्शविलेल्या नगरपरिषद/नगरपंचायतीमध्ये बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

असे आदेश मनोज रानडे आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी असे आदेश महाराष्ट्र राज्यासहित जिल्ह्यातील बदल्याचे आदेश देण्यात आले.

जालना जिल्ह्यातील नगर परिषद व नगरपंचायतमध्ये ६ नवीन लेखापाल रूजू झाले आहे. त्यामध्ये अंबड नगरपालिकेत लेखापाल म्हणून भाऊसाहेब विलास म्हसे हे रूजू झाले आहेत. तसेच तुपे पवन सुभाष हेही अंबड नगरपरिषदेमध्ये रूजू झाले आहे. तर घनसावंगी येथे योगेश बळीराम काटकर रूजू झाले आहे. भोकरदनला रेवगडे ज्ञानेश्वर गुलाबराव रूजू झाले आहे. तसेच शिरूर कसार येथून मंठा येथे नगरपंचायतमध्ये दामोधर चंद्रकांत धोंडीबा तर बदनापुर नगरपंचायतमध्ये लेखापाल म्हणून तायडे चंदेश पुरूषोत्तम रूजू झाले आहे.

# स्त्री व पुरुष हे प्रथमतः मानव आहेत त्यांना त्यांच्या क्षमता विकसित करण्यासाठी अवकाश दिला गेला पाहिजे -प्रा.अरुंधती पाटील

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

समाजातील स्त्री व पुरुष हे प्रथमतः मानव असून त्यांना त्यांच्या क्षमता विकसित करण्यासाठी अवकाश मिळायलाच हवा असे प्रतिपादनजेष्ठ समाजसेविका तथा मनस्विनी महिला सेवाभावी संस्थेच्या समन्वयक प्रा अरुंधती पाटील यांनी केले. त्या अंबाजोगाई शहरातील राज्य परिवहन महामंडळाच्या बस आगरामध्ये आयोजित कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ अधिनियम २०१३ (प्रतिबंध मनाई व निवारण या विषयावर) कार्यशाळेत बोलत होत्या. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई बस आगाराचे प्रमुख अमर राऊत व वाहतूक निरीक्षक धोंडीबा पल्लेवाड, सहाय्यक वाहतूक निरीक्षक मिठू खाडे, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार ,सचिव विष्णू सरवदे उपस्थित होते.

कार्यशाळेच्या प्रारंभ दीपप्रज्वलन करून आगार प्रमुख व इतर मान्यवरांचे स्वागत करून करण्यात आले.सदरील कार्यशाळेचे प्रास्ताविक शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार यांनी केले. आपले सविस्तर विवेचनाची सुरुवात प्रा. अरुंधती पाटील यांनी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ अधिनियम २०१३




**मनस्विनी महिला विकास प्रकल्प व शिक्षक मैत्री प्रतिष्ठान यांच्या वतीने अंबाजोगाई बस आगारात लैंगिक छळ या विषयी कार्यशाळा संपन्न**

प्रतिबंध मनाई व निवारण या विषयावर उपस्थित महिलांना विविध प्रश्न विचारतच सुरुवात केली. याप्रसंगी विविध चित्रफितीच्या माध्यमातून कामाच्या ठिकाणी महिलांनी व मुलींनी सुरक्षितता कशा प्रकारे बाळगावी याविषयी सविस्तर पणे मार्गदर्शन केले. आजच्या या दोन तासाच्या कार्यशाळेमध्ये वरील विषया संबंधी असे कायदे करण्याची गरज का भासली यावर देखील चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर स्त्रिया आणि पुरुष या प्रथम माणूस आहे आणि माणूस म्हणूनच त्यांना त्यांच्या क्षमता विकसित करण्यासाठी अवकाश दिला गेला पाहिजे असे परखड मत प्रा पाटील यांनी मांडले.

स्त्री व पुरुष यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची विषमता होऊ नये, मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहुन करीअर घडवित असतांना कामाच्या ठिकाणी स्नेहपूर्ण असे वातावरण असायला हवे व तसे वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी तेथील सर्व पुरुष आणि स्त्रिया या दोघांची असल्याची भावना याप्रसंगी प्रा अरुंधती पाटील यांनी व्यक्त केली. त्यांच्यामध्ये सामंजस्य पूर्ण संबंध निर्माण झाले तरच त्याठिकाणी अधिक गतीने कार्य होऊ शकते अशा प्रकारचे सविस्तर मार्गदर्शन प्रा. अरुंधती पाटील यांनी सदरील कार्यशाळेत केले.

कार्यशाळेच्या शेवटी शिक्षक मैत्रीचे सचिव विष्णू सरवदे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमास अंबाजोगाई बस आगारातील सर्व महिला व पुरुष कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. ही कार्यशाळा संपन्न करण्यासाठी मनस्विनीच्या अंजली कोदरकर व शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अशोक पोपळघट यांनी परिश्रम घेतले.

पान ६ वरून...

## भविष्यात प्रिंट मीडिया

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल सोळुंके, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, संपादक सर्वोत्तम गावस्कर, राज्य सरकारच्या अधिस्वीकृती समितीचे सदस्य अनिल महाजन, डिजिटल मीडिया जिल्हा कार्याध्यक्ष दिनकर शिंदे गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, डिजिटल मीडिया परिषदेचे तालुकाध्यक्ष अविनाश इंगावले यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी डिजिटल मीडिया परिषदेच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अनिल वाघमारे यांचा उपस्थित मान्यवर आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर डिजिटल मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी दिनकर शिंदे यांची निवड जाहीर करून सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना एस एम देशमुख म्हणाले की, काळ बदलत आहे तशा पद्धतीने पत्रकारांनीही आपली भूमिका बदलणे गरजेचे आहे. आजच इलेक्ट्रॉनिक मीडियाने आपले स्वतंत्र यूट्यूब चैनल सुरू केले आहेत तर काही दैनिक आणि पत्रकार यांनी सुद्धा आपले युट्युब चॅनल सुरू केले आहेत. भविष्यात प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाचे महत्त्व अधिक वाढणार आहे. त्यामुळे या क्षेत्रात टिकायचे असेल तर पत्रकारांनी डिजिटल मीडियामध्ये सहभागी होऊन सक्रियपणे काम करावे. विविध न्यूज चैनल आणि वर्तमानपत्रे आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी सरकार नेहमीच प्रयत्न करत आहे त्यासोबतच आता डिजिटल मीडिया ही आपल्याच ताब्यात राहावा यासाठी शासनाचे प्रयत्न आहेत. ते आम्हाला मान्य नाही म्हणूनच मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषद याचा तीव्र विरोध करत आहे. राज्यातले सरकार स्वतःच्या राजकीय हितासाठी नको त्या योजना जाहीर करून तिजोरीतील पैसा कमी करून कर्जबाजारी होत आहे. याबाबत पत्रकारांनी आवाज उठवण्याची गरज आहे. मराठी पत्रकार परिषदेची सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषद राज्यातल्या ३६ जिल्ह्यांमध्ये पोहोचले असून, प्रत्येक तालुक्यापर्यंत या संघटनेचे सदस्य उभा राहिले आहेत. ही आपली जमेची बाजू असून येणाऱ्या काळात डिजिटल मीडियाच्या माध्यमातून नवी क्रांती करण्यासाठी या पत्रकारांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे, मात्र आजही काही संपादकांना ही वस्तुस्थिती मान्य होत नाही. जेव्हा त्यांना यातील खरी स्थिती माहिती होईल तेव्हा खूप उशीर झालेला असेल असेही ते म्हणाले.

माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, पत्रकार हा समाज आणि सत्ताधाऱ्यांना त्यांचा खरा चेहरा दाखवणारा आरसा आहे. कोणी चांगलं काम करत असेल तर त्याला चांगले म्हटले पाहिजे परंतु चुकीचे काम करत असेल तर ते चूक मांडण्याची भूमिका सुद्धा पत्रकारांनी घेतली पाहिजे. आज राज्यातल्या सरकारने आर्थिक उधळपट्टी सुरू केली आहे. मात्र दुसरीकडे महागाई, बेरोजगारी वाढल्याने गरिबांना जीवन जगणे मुश्किल झाले आहे. राज्य सरकारच्या विरोधात सामान्य जनतेमध्ये प्रचंड रोष आहे, खदखद आहे, ती पत्रकार बांधवांनी आपल्या प्रिंट आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून जगासमोर आणावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे म्हणाले की, एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र आणि देशात मराठी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून जागरूक पत्रकारांची एक मोठी फळी निर्माण झालेली आहे. म्हणूनच पत्रकारांना पेन्शन आणि संरक्षण कायदा सरकारला मंजूर करावा लागला आहे. या पुढच्या काळात स्वाभिमानाने खंबीरपणे पत्रकारांना काम करता यावे यासाठी डिजिटल मीडिया परिषद सक्रियपणे राज्यभर काम करणार आहे. संघटना वाढवून पत्रकारांना न्याय मिळवून देण्यासाठी स्वतःला झोकून देऊन काम करणाऱ्या पत्रकारांची संघटनेला गरज आहे. त्यामुळे पत्रकारांनी ग्रामीण भागातही एकजुटीने खांद्याला खांदा लावून काम करावे असे आवाहन केले.

याप्रसंगी कार्यक्रमास ज्येष्ठ पत्रकार आयुब बागवान, सुभाष सुतार, गणेश क्षिरसागर, सुभाष शिंदे, सोमनाथ मोटे, संपादक सुनील पोपळे, शेख जावेद, प्रसाद कुलकर्णी, शेख खाजा, गजानन चौकटे, शेख इर्शाद, नवनाथ काळे, ओम साबळे या पत्रकारांसह एकनाथ लाड, नारायण झेंडेकर, संतोष कोटेकर, गणेश माने, सचिन पुणेकर, अनिल गंगणे आदींसह बीड जिल्ह्यातील मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेचे सदस्य पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनकर शिंदे, सूत्रसंचालन सुभाष शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन सोमनाथ मोटे यांनी केले.

## तरुणांना रोजगार मिळवून देणारे

घुमरे, बाळू आमटे आदींची उपस्थिती होती.

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, माझे सहकारी भाऊसाहेब डावकर यांच्या पुढाकारातून सामाजिक बांधिलकी म्हणून खाजगी कंपनीच्या सामाजिक दायित्व निधीतून ४० संगणक संच जिल्हा परिषद शाळांना उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना शाळेतच तांत्रिक शिक्षण मिळेल. त्यातून विद्यार्थी अभ्यासू होतील. बीड विधानसभा मतदारसंघात स्व.केशरकाकू क्षीरसागर यांनी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून शिक्षणाची गंगा आणली. या क्षेत्रात अलीकडे अमुलाग्र बदल झाले आहेत. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि रोजगार मिळवून देणारे शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी आपण कायम आग्रही असतो, असेही डॉ.क्षीरसागर म्हणाले. यावेळी भाऊसाहेब डावकर यांचा सत्कार करून मान्यवरांनी नाळवंडी जिल्हा परिषद गटातील ४० शाळांना संगणक संच वितरित केले. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साडेपाच वर्षांच्या चिमुरडीवर

आरोपीस चार दिवसाची पोलीस कोठडी

शहरातील साडेपाच वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या आरोपी राहुल वायखिंडे यास दि ०५ ऑक्टोबर शनिवार रोजी रात्री उशिरा पोलीसांनी अटक करुन दि ०६ ऑक्टोबर रविवार रोजी आरोपी राहुल वायखिंडे यास पोलीसांनी माजलगाव येथील जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालयात हाजर केले असता जिल्हा सत्र न्यायालयाचे दुसरे न्यायाधीश बी.जी.धर्मधिकारी यांनी आरोपी राहुल वायखिंडे यास चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

आज माजलगाव बंदची हाक

शहरातील साडेपाच वर्षाच्या चिमुरडीवर एक खाजगी बालवाडीत शिक्षकानेच अत्याचार केल्याच्या निषेधार्थ शहरातील संतप्त पालकांनी आज दि ०७ ऑक्टोबर सोमवार रोजी माजलगाव बंदची हाक देत शहरातील हानुमान चौक ते शहर पोलीस ठाणे ते तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार येऊन या प्रकरणातील आरोपीस फाशी देण्याची मागणी शहर पोलिस व तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे संतप्त पालक करणार आहेत.

## अनिलदादांच्या होम मिनिस्टर

मा. एकनाथजी शिंदे साहेब यांनी माझी लाडकी बहीण, अन्नपूर्णा अशा विविध योजना महिला सबळीकरणासाठी अमलात आणल्या आहेत. आम्ही देखील मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या प्रेरनेतूनच महिला सन्मान व हिताचे कार्यक्रम-उपक्रम राबवत आहोत असे अनिलदादांनी आपल्या मनोगत भाषणात महिला-भगिनींसमोर भावना व्यक्त केल्या व आगामी काळात आपण मोठ्या स्वरूपात महिला भगिनींसाठी अशा आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमाचे वारंवार बीड शिवसेनेच्या वतीने आयोजन करण्यात करणार असल्याचेही अनिलदादा जगताप यांनी सांगितले. जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी मनोगत भाषणात सर्व महिला भगिनींचे स्वागत करत त्यांना शुभेच्छा दिल्या. विजेत्या महिलांना फ्रिज, टीव्ही, शिलाई मशीनसह पैठणी साडी देण्यात आली तर सर्व सहभागी महिलांना आकर्षक भेटावस्तु दिल्या. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण असणारे अवघ्या महाराष्ट्रातील महिलांचे लाडके भाऊजी किरण पाटील यांनी या कार्यक्रमास विशेष रंगत आणली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिक कांबळे यांनी केले तर ऋषिकेश मोहळे आणि सुमित केंद्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कुणाचीही गैर सोय न होऊ देता अत्यंत नियोजनबद्ध पार पडलेल्या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन कार्यक्रमाचे आयोजक अमोल जाधव व त्यांच्या मित्रमंडळाने केले होते. याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी अमोल मामा जाधव मित्रमंडळाचे विशेष कौतुक केले. या कार्यक्रमासाठी शिवसेना जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, ॲडव्ह संगीता चव्हाण, शेषेराव जगताप नगराध्यक्ष वडवणी यांच्यासह शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी- लोकप्रतिनिधी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते तर बीड शहर-ग्रामीण भागातील महिला हजारोंच्या संख्येमध्ये उपस्थित होत्या.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.७ ऑक्टोबर २०२४
४

# टोमॅटोचे भाव वाढले, बळीराजाला दिलासा

टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. सध्या टोमॅटोच्या दरात ( ) चांगलीच वाढ होताना दिसत आहे. दिल्लीत () २४ तासांत टोमॅटोच्या किरकोळ किंमतीत २० रुपयांनी वाढ झाली आहे. १ किलो टोमॅटोची खरेदी करण्यासाठी दिल्लीत १०० रुपये मोजावे लागत आहेत. दुसरीकडे घाऊक बाजारात टोमॅटोच्या दरात १० रुपयांनी वाढ झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, सणासुदीच्या काळात टोमॅटोच्या मागणीत वाढ आणि पुरवठ्याचा अभाव यामुळे दरात वाढ झाली आहे.

दिल्लीत टोमॅटोचे भाव १०० रुपये किलोवर

नवरात्रीचा तिसरा दिवस सुरू असून देशाची राजधानी दिल्लीत टोमॅटोचे भाव १०० रुपये किलोवर पोहोचले आहेत. विशेष बाब म्हणजे दिल्लीत टोमॅटोच्या किरकोळ किंमतीत २४ तासांत २० रुपयांनी वाढ झाली आहे. दुसरीकडे घाऊक बाजारात टोमॅटोच्या दरात १० रुपयांनी वाढ झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, सणासुदीच्या काळात टोमॅटोच्या मागणीत वाढ आणि पुरवठ्याचा अभाव यामुळे दरात वाढ झाली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या एका महिन्यात टोमॅटोच्या दरात २७ रुपयांनी वाढ झाली आहे. राजधानी दिल्लीपासून सरकारी आकडेवारीनुसार



टोमॅटोच्या किमतीत किती वाढ झाली आहे.

२४ तासांत टोमॅटोचे भाव किलोमागे २० रुपयांनी वाढले स्टोमॅटोचे भाव वाढले, बळीराजाला दिलासा : नवरात्री उत्सवात देशाची राजधानी दिल्लीत टोमॅटोच्या दराने १०० रुपये किलोचा टप्पा ओलांडला आहे. तर एक दिवसापूर्वी टोमॅटोचे किरकोळ भाव ८० रुपये किलो होते. म्हणजेच २४ तासांत टोमॅटोचे भाव किलोमागे २० रुपयांनी वाढले आहेत. किरकोळ विक्रेते पप्पू सांगतात की येत्या काही दिवसांत टोमॅटोचे दर १२० रुपये किलोपर्यंत पोहोचू शकतात. टोमॅटो विक्रेत्याने दिलेल्या माहितीनुसार, ३ ऑक्टोबरला त्याला बाजारातून ७० रुपये किलोने टोमॅटो मिळाला. त्यामुळे किरकोळ बाजारातील भाव ८० रुपयांपेक्षा जास्त होते. तर शनिवारी सकाळी तो बाजारात पोहोचला तेव्हा टोमॅटोचा भाव ८० रुपये किलो होता. त्यामुळे किरकोळ विक्रीसाठी १०० रुपये किलोने विकावे लागत आहे.

टोमॅटोचे भाव वाढण्याचे मुख्य कारण काय?

तज्ज्ञांच्या मते टोमॅटोचे भाव वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे सणासुदीची मागणी. त्यामुळे दरात वाढ झाली आहे. दुसरीकडे, उत्पादनात कमतरता आहे. या उष्णतेच्या लाटेमुळे टोमॅटो पिकाचे नुकसान झाले. त्याचवेळी मान्सूनला उशीर झाल्याने टोमॅटोच्या उत्पादनावरही परिणाम झाला. त्यानंतर अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान तर झालेच शिवाय पुरवठ्यातही अडचणी आल्या. त्यामुळेच टोमॅटोचे भाव वाढत आहेत.

काय सांगतात सरकारी आकडे?:सरकारी आकडेवारीबद्दल बोलायचे झाले तर, गेल्या एका महिन्यात टोमॅटोच्या किमतीत २७ रुपयांनी वाढ झाली आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटनुसार, ४ सप्टेंबर रोजी टोमॅटोचा भाव ४३ रुपये प्रति किलो होता, तो वाढून ७० रुपये किलो झाला आहे. म्हणजेच टोमॅटोच्या दरात २७ रुपयांनी वाढ झाली आहे. जर आपण फक्त ऑक्टोबरबद्दल बोललो तर ३० सप्टेंबरला टोमॅटोचा भाव ६३ रुपये प्रति किलो होता, त्यात ४ ऑक्टोबरपर्यंत ७ रुपयांनी वाढ झाली आहे.

## आंबिया बहरातील फळपिकांसाठी विमा योजना



कमी पाऊस/जास्त पाऊस, पावसातील खंड, सापेक्ष आर्द्रता अशा विविध हवामान धोक्यामुळे फळपिकांचे मोठे नुकसान होते. अशा नुकसानीच्या परिस्थितीत शेतकऱ्याचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखण्यासाठी शासनाने हवामान आधारित पीकविमा योजना लागू केली आहे. आंबिया बहर २०२४ या योजनेमध्ये संत्रा, मोसंबी, डाळिंब,आंबा, काजू, केळी, द्राक्ष,पपई,स्ट्रॉबेरी या फळपिकांचा समावेश आहे. सर्वसाधारणपणे ज्या महसूल मंडळात त्या फळपिकाखाली २० हेक्टर किंवा त्याहून अधिक उत्पादनक्षम क्षेत्र आहे अशा महसूल मंडळांना त्या फळपिकासाठी अधिसूचित करण्यात येऊन तेथे ही योजना राबविण्यात येते. केवळ उत्पादनक्षम फळबागांना विमा संरक्षण लागू राहणार आहे.

योजनेची माहिती :

योजनेत अधिसूचित क्षेत्रात, अधिसूचित फळपिकासाठी कुळाने, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांसहित इतर सर्व शेतकरी भाग घेवू शकतात. पीककर्ज घेणाऱ्या आणि बिगर कर्जदारांसाठी योजनेतील सहभाग ऐच्छिक राहणार आहे. बिगर कर्जदार शेतकरी विहित मुदतीत बँकेने किंवा ऑनलाइन फळपीक विमा पोर्टल ु.षिलू.सीं.ळप वर विमा हप्ता जमा करून सहभाग घेवू शकतात. त्यासाठी आधार कार्ड, जमीन धारणा ७ /१२, ८(अ) उतारा व पीक लागवड स्वयंघोषणा पत्र, फळबागेचा जीओ टॅगींग केलेला फोटो, बँक पासबुकवरील बँक खाते बाबत सविस्तर माहिती लागेल. कॉमन सर्विस सेंटर मार्फत अर्ज ऑनलाइन भरता येतील.

शेतकऱ्यांनी फळपीक लागवड केलेली नसताना किंवा उत्पादन योग्य फळपीक नसताना, दुसऱ्याच्या जमिनीवर किंवा शासनाच्या जमिनीवर, अकृषक जमिनीवर विमा काढून विमा योजनेत सहभाग घेतल्यास त्यांच्या विरुद्ध कडक कारवाई होऊ शकते.

यासाठी ज्यांच्याकडे उत्पादन योग्य वयाची फळबाग आहे, त्यांनी योजनेत सहभाग घ्यावा. शेतकऱ्यांनी स्वतःच्या जमिनीवर फक्त विमा घ्यावा. शेतकऱ्यांसाठी विमा हप्ता हा सर्वसाधारणपणे विमा संरक्षित रकमेच्या ५ टक्यांच्या मर्यादेत असतो. मात्र एकूण वास्तव दर्शी विमा हप्ता ३५ टक्यांहून अधिक असल्यास त्या अधिक विमा हप्त्यातील ५० टक्के भार शेतकऱ्यांना उचलावा लागतो. विमा हप्ता दर जिल्हा निहाय वेगवेगळे असू शकतात. त्यामुळे शेतकऱ्याने भरावयच्या विमा हप्त्यात जिल्हानिहाय फरक असू शकतो.

## वारणाच्या जातीवंत म्हैस पैदास योजनेतून म्हशी वितरणास प्रारंभ

कोल्हापूर : वारणा दूध संघाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे यांचे वाढदिवसाचे औचित्य साधत संघाकडून वारणा दूध संघाच्या जातिवंत म्हैस संवर्धन व पैदास योजनेतून दूध उत्पादकांना म्हैस वितरण करण्यात आले. अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे यांनी संघाच्या वार्षिक सभेत योजनेची घोषणा केली होती. वारणा दूध संघाने माफक दरात पशुवैद्यकीय सेवा, अमृत पशुधन सुरक्षा कवच योजना, वात्सल्य रेडी संगोपन योजना, सायलेज बेल वितरण याबरोबरच इतर अनुदानपर योजना दूध उत्पादकांच्या हितार्थ चालू केल्या आहेत. या योजनेच्या माध्यमातून दूध उत्पादकांना दूध व्यवसाय करण्यास चालना मिळत आहे.




नुकतीच संघाने जातिवंत म्हैस संवर्धन व पैदास कार्यक्रम चालू केला आहे.संघाकडून ४०० ते ५०० म्हैशीचा गोठा तयार करण्यात येणार आहे.या योजनेच्या माध्यमातून दूध उत्पादक शेतकरी संघाचे गोठ्यावरून मु-हा व मेहसाना जातीच्या म्हैशी माफक दरात खरेदी करता येणार आहेत. संघाकडून विक्री करण्यात येणाऱ्या म्हशींना विमा संरक्षण मिळणार असून यावेळी संघाचे कार्यकारी संचालक मोहन येडूरकर संचालक शिवाजी जंगम, अभिजित पाटील, के.आर.पाटील, अकौंटस्? मॅनेजर सुधीर कामेरीकर, संकलन व्यवस्थापक अशोक पाटील, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. जे. बी. पाटील, डॉ. एन. एस. वडजे, शरद शेटे उपस्थित होते.

## कापसातील पातेगळ आणि बोंडगळचे व्यवस्थापन

कापूस पिकात आपत्कालीन परिस्थितीत वेगवेगळ्या कारणांमुळे पातेगळ आणि बोंडगळ सारख्या समस्या उद्‌भवतात. या समस्येचे विविध कारणे आणि त्यावरील व्यवस्थापन उपाय जाणून घेतल्यास त्यावर उपाययोजना करून नुकसान टाळता येते.

पातेगळ आणि बोंडगळ होण्याची कारणे : जास्त किंवा कमी झालेला पाऊस पातेगळ आणि बोंडगळ होण्यास कारणीभूत ठरते, तसेच तापमानातील अचानक झालेला चढउतार हे सुद्धा महत्वाचे कारण आहे. कापूस पिकाच्या वाढीच्या अवस्थेत पोषक घटकांसाठी होणारी स्पर्धा. कापूस पिकात होणारा किडींचा प्रादुर्भाव. शेतात पाणी साचून राहणे किंवा जमिनीतील ओलावा कमी होणे. सूर्यप्रकाशासाठी होणारी पिकांची स्पर्धा

पातेगळ आणि बोंडगळ समस्येवर उपाय : आकस्मिक परिस्थितीत कापूस पिकात पुरेसे अन्न आणि पाणी व्यवस्थापन करावे. पिकात एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करावे. नॅफ्थाइल



ॲसिटिक ॲसिड २० पीपीएम याप्रमाणात फवारणी करावी. पिकाचे वाढ नियंत्रण करून शेंडा खुडणी करावी. पोटॅशियम नायट्रेटची १ टक्के याप्रमाणात फवारणी करावी. पिकामध्ये भरपूर हवा व सूर्यप्रकाश मिळावा म्हणून व्यवस्थापन करावे. पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी त्यानंतर १५ ते २० दिवसाच्या अंतराने दुसरी आणि तिसरी वेचणी करावी. कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पऱ्हाट्या उपटून शेताबाहेत न्यावे व त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा, जेणेकरून त्यात दडलेल्या किडींच्या अवस्था नष्ट होतील.

# मोसंबीचे कीड, रोग व्यवस्थापन

निसर्गतः संत्रा/मोसंबी फळझाडास वर्षातून तीनदा बहार येतो. त्यापैकी पावसाळ्यात (जून-जुलै) येणाऱ्या बहारास ''मृग बहार (मृग नक्षत्रात येणारा) आणि पावसाळा संपल्यानंतर (ऑक्टोबरमध्ये) येणाऱ्या बहारास ''हस्त बहार (हस्त नक्षत्रात येणारा) तर थंडी संपतेवेळी (जानेवारी-फेब्रुवारी) म्हणजे आंब्याला ज्या वेळी बहार येतो तो ''आंबिया बहार असे तीन बहार वेगवेगळ्या ऋतूंमध्ये येतात.

मागील काही दिवसांपासून शेतकरी सातत्याने अवकाळी आणि सुलतानी संकटात सापडत आहे. या संकटातून कोणताच शेतकरी वाचताना दिसत नाही. तसेच फळबाग उत्पादक शेतकरी देखील अडचणीत येताना दिसत आहेत. मोसंबी उत्पादक शेतकरी देखील अडचणीत सापडले आहेत. मोसंबीवर सातत्याने मावा, सिल्ला, पाने खाणारी अळी, ढेकूण, डिंक्या अशा रोगांमुळे शेतकरी अडचणीत येतात. फळगळ देखील सातत्याने होत असते. यामुळे आंतरमशागतीची कामे वेळेवर करून तणनियंत्रण करावे. किडींचा प्रादुर्भाव लक्षात घेता सापळे लावावेत, असा सल्ला कृषी अभ्यासक



देतात.

किड आणि रोग व्यवस्थापन : मावा किडीच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट २० मिलीलीटर दहा लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसंच पाने खाणाऱ्या अळीला रोखण्यासाठी क्विनॉलफॉस २० मिलीलीटर १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. ढेकूणच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २५ मिलीलीटर किंवा डायमेथोएट २० मिलीलीटर १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

आंबिया बहार घेण्याकरिता खताचे नियोजन : डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून ताणावर सोडल्यानंतर त्वरीत प्रत्येक झाडाला ४० ते ५० किलो शेणखत टाकून आडवी आणि उभी वखरण करावी.

जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा तापमान वाढताच हलके ओलित करावे. ताण तोडतांना हलक्या ओलिताअगोदर प्रत्येक झाडाला ६०० ग्रॅम नत्र + ४०० ग्रॅम स्फुरद + ४०० पालाश आणि भरखते द्यावीत, त्यानंतर पाच ते सात दिवसांनी दुसरे पाणी (चिंबवणी) द्यावे. तिसऱ्या पाळीला भरपूर पाणी द्यावे. ताण सोडल्यावर २० ते २५ दिवसांनी फुले येतात. त्यानंतर उरलेल्या नत्राचा (अर्धा) हप्ता एक ते दीड महिन्याने किंवा फळे वाटाण्याएवढी झाल्यावर द्यावा. हलक्या जमिनीत नत्राची मात्रा तीन ते चार हप्त्यात विभागून दिल्यास जास्त फायदेशीर ठरते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### वेद दिन

### महत्वाच्या घटना

१६७९ : सिद्दी जौहर आणि इंग्रजांचा मारा रोखत मराठ्यांनी खांदेरी किल्ल्याभोवती एक मीटर उंचीचा तट उभारून पूर्ण केला.
१८१४ : दुसर्या बाजीरावाने पांडुरंग कोल्हटकराच्या साहाय्याने 'उंदेरी-खांदेरी' किल्ल्यांचा ताबा परत मिळवला.
१८२२ : ब्राझिलला (पोर्तुगालपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९०६ : 'बँक ऑफ इंडिया'ची स्थापना झाली. ही भारतात स्थापन झालेली पहिली स्वदेशी व्यापारी बँक आहे.
१९२३ : आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी पोलिस आयोग (आय. सी. पी. सी) ची स्थापना व्हीयना येथे करण्यात आली.
१९३१ : दुसर्या गोलमेज परिषदेची सुरूवात झाली.
१९७८ : मधुमेह नियंत्रित करण्यासाठी उपयोगी पडणारे इन्सुलिन प्रथमच जनुक अभियांत्रिकी पद्धतीने तयार करण्यात यश.
१९७९ : दिवाळखोरी टाळण्यासाठी 'ख्रायसलर कॉर्पोरेशन'ने अमेरिकन सरकारकडे १ बिलियन डॉलर्सची मागणी केली.
२००५ : इजिप्तमधे पहिल्यांदाच बहुपक्षीय सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या.
२००९ : भारतीय बिलियर्डस खेळाडू पंकज अडवाणी यांनी वर्ल्ड प्रोफेशनल बिलियर्ड्‌र्सचे जेतेपद जिंकले.
२०१८ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली येथे नीती आयोग द्वारे आयोजित वैश्विक गतिशीलता शिखर संमेलनाचे उद्घाटन केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९१ : उमाजी नाईक पहिला क्रांतिकारक स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: ३ फेब्रुवारी १८३२)
१८०७ : न्यूझीलंड देशाचे पहिले पंतप्रधान हेन्री सिवेल यांचा जन्म. (मृत्यू: १४ मे १८७९)
१८८७ : साहित्य अकादमी पुरस्कार व पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय संस्कृत विद्वान आणि महान दार्शनिक संस्कृत-तंत्र अभ्यासक, भारतीय शास्त्रज्ञ आणि तत्वज्ञ गोपीनाथ कविराज यांचा जन्मदिन.
१८२२ : रामकृष्ण विठ्ठल तथा भाऊ दाजी लाड प्राच्यविद्या पंडित, पुरातत्त्वज्ञ, कर्ते समाजसेवक आणि कुशल धन्वतंरी, ग्रँट मेडिकल कॉलेजच्या पहिल्या तुकडीतील विद्यार्थी (मृत्यू: ३१ मे १८७४)
१८२६ : बंगाल नवजागृतीचे प्रसिद्ध भारतीय बंगाली भाषिक लेखक राजनारायण बसु यांचा जन्मदिन.
१८४९ : बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर हिन्दुस्तानी शास्त्रीय गायक, ग्वाल्हेर गायकीचा महाराष्ट्रात प्रचार केला (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९२७)
१९१२ : डेव्हिड पॅकार्ड ह्युलेट पॅकार्ड कंपनीचे एक संस्थापक (मृत्यू: २६ मार्च १९९६)
१९१५ : डॉ. महेश्वर नियोग प्रख्यात आसामी साहित्यिक आणि इतिहासकार, पद्मश्री (१९७४), आसाम साहित्य परिषदेचे अध्यक्ष (मृत्यू: १३ सप्टेंबर १९९५)
१९१७ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय चिकित्सक व वैज्ञानिक बानो जहाँगीर कोयाजी यांचा जन्मदिन.
१९२५ : भानुमती रामकृष्ण तामिळ व तेलगू चित्रपटांतील अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माती, गीतकार, संगीतकार, गायिका व लेखिका (मृत्यू: २४ डिसेंबर २००५)
१९३३ : इला भट्ट मॅगसेसे पारितोषिक विजेत्या समाजसेविका, वकील व 'सेवा' ' या संस्थेच्या संस्थापिका
१९३४ : सुनील गंगोपाध्याय बंगाली कवी व कादंबरीकार (मृत्यू: २३ आक्टोबर २०१२)
१९३४ : बी. आर. इशारा चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथालेखक (मृत्यू: २५ जुलै २०१२)
१९४० : चंद्रकांत खोत लेखक व संपदक
१९६३ : अशोकचक्र पुरस्कार सन्मानित शूरवीर भारतीय वैमानिक नीरजा भनोट यांचा जन्मदिन.
१९६७ : भारतीय-इंग्लिश अकाउंटंट आणि राजकारणी आलोक शर्मा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६०१ : विल्यम शेक्सपियर यांचे वडील जॉन शेक्सपियर यांचे निधन.
१८०९ : थायलंडचा राजा बुद्ध योद्फा चुलालोके यांचे निधन.
१९५३ : भगवान रघुनाथ कुळकर्णी ऊर्फ 'फुलारी' ऊर्फ 'बी. रघुनाथ' लेखक व कवी (जन्म: १५ ऑगस्ट १९१३)
१९७९ : जनार्दन ग्यानोबा तथा 'जे. जी.' नवले भारतीय कसोटी क्रिकेट संघाचे पहिले यष्टिरक्षक(जन्म: ७ डिसेंबर १९०२)
१९९१ : रवि नारायण रेड्डी 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' चे सहसंस्थापक (जन्म: ५ जून १९०८)
१९९४ : टेरेन्स यंग, चिनी इंग्लिश दिग्दर्शक आणि पटकथाकार (जन्म: २० जून १९१५)
१९९७ : मुकूल आनंद तांत्रिक करामतीचे जादूगार म्हणून नाव कमावलेले हिन्दी चित्रपट निर्माते व दिग्दर्शक (जन्म: ११ आक्टोबर १९५१)
१९९८ : गुजरात, मध्य प्रदेश आणि पॉन्डिचेरी या केंद्र शासित प्रदेशाचे माजी राज्यपाल के. एम चांडी यांचे निधन.
२०१३ : भारतीय परराष्ट्र सचिव, दिल्ली, अंदमान आणि निकोबार बेटांचे माजी उपराज्यपाल आणि त्रिपुरा, गोवा आणि उत्तर प्रदेश राज्यांचे माजी राज्यपाल रोमेश भंडारी यांचे निधन.

# स्वामी रामानंद तीर्थ यांच्यासारखा निष्काम कर्मयोग करता आला पाहिजे -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तिर्थ यांनी एकाच वेळी बलाढ्य ब्रिटिश सत्तेशी सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात लढाई केली. हे कार्य करीत असताना त्यांनी सर्वसामान्य जनतेशी नाळ जुळवून ठेवल्याने, सर्वसामान्य जनतेने त्यांना दोन वेळा वेगवेगळे ठिकाणाहून निवडून दिले. या पदांचा उपयोग त्यांनी स्वतःसाठी न करता जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी, जनतेच्या हितासाठी केल्याने हैद्राबाद संस्थान निजामापासून मुक्त झाले तसेच मराठवाड्याला महाराष्ट्र मध्ये विलीन होण्याची संधी लाभली. याचे श्रेय केवळ स्वामी रामानंद तीर्थ यांच्या निष्काम कर्मयोगाला आहे त्यामुळे राजकारणात, समाजकारणात शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींनी त्यांचा आदर्श डोळ्यांपुढे ठेवून निष्काम कर्मयोगी बनण्याचा प्रयत्न करावा असे वक्तव्य सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

शहरातील कर्तव्य मतिमंद मुलांच्या निवासी वसतीगृहावर आयोजित स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवकुमार निर्मळे, संस्थेचे अध्यक्ष संभाजीराव लांडे तसेच अभियंता श्री पुरी यांची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाची सुरूवात परमपूज्य स्वामी रामानंद तीर्थ तसेच बाबासाहेब परांजपे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. पुढे बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जीवन कार्यावर,विविध जीवन पैलूंवर प्रकाश टाकत स्वामी रामानंद तीर्थ हे खऱ्या अर्थाने जनताचे लोकनायक होते हे स्पष्ट केले. त्या काळामध्ये तीन विषयांमध्ये पदवी प्राप्त करणारा तसेच एम.ए.विषयांमध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त करणारे स्वामी रामानंद तीर्थ यांनी अंबाजोगाईच्या योगेश्वरी शिक्षण संस्थेत मुख्याध्यापक म्हणून काम पाहिले ही अंबाजोगाईच्या दृष्टीने अत्यंत गौरवाची आणि गर्वाची गोष्ट आहे त्यामुळे येथील शैक्षणिक संस्थांनी त्यांचा हा ऐतिहासिक वारसा जपण्याचे काम करावे असे आवाहन डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी केले. देशामध्ये मुली या आईच्या पोटात सुद्धा सुरक्षित नाहीत अशा प्रसंगी संभाजीराव लांडे सर हे विकलांग मुलींना सांभाळत आहेत, पोटच्या मुलींप्रमाणे जपत आहेत ही बाब स्वामी रामानंद तीर्थ यांच्या निष्काम कर्मयोगाचा वारसा पुढे नेण्यासारखे आहे या शब्दांत संभाजीराव लांडे यांचा गौरवोद्गार केला. यावेळी बोलताना सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवकुमार निर्मळे यांनी स्वामीजी हे एक उत्तुंग व्यक्तिमत्व होते त्यांचा परिस्पर्श योगेश्वरी शिक्षण संस्थेला झाल्याने योगेश्वरी शिक्षण संस्था ही गौरवशाली इतिहासाची ऐतिहासिक साक्षीदार आहे या शिक्षण संस्थेचा मुख्याध्यापक म्हणून कार्य करण्याचे भाग्य मला लाभले हा मी माझा गौरव समजतो असे भावस्पर्शी उद्गार काढले. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या या कार्याचा वारसा जपण्याचे काम योगेश्वरी शिक्षण संस्था ताकदीने करीत आहे आणि यापुढे ही करीत राहील असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. अध्यक्षीय समारोप करताना संभाजीराव लांडे यांनी स्वामी रामानंद तीर्थ यांचे कार्य अथांग सागराप्रमाणे आहे. त्यांनी सामाजिक शैक्षणिक राजकीय सांस्कृतिक क्षेत्रात ज्या ताकदीने काम केले. त्या विचारांचा वारसा कर्तव्य मतिमंद मुलींच्या निवासी वसतीगृहामध्ये कार्यरत असलेला प्रत्येक कर्मचारी आपल्या परीने जपण्याचे काम करत आहे व करीत राहील अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता चौधरी यांनी केले तर उपस्थितांचे आभार मनीषा गांगुर्डे यांनी मानले.




## राजकीय विरोध म्हणून जाणीवपूर्वक शुभेच्छा बॅनर फाडले!



परळी । प्रतिनिधी

नवरात्र उत्सवानिमित्त लावण्यात आलेले शुभेच्छा बॅनर जाणीवपूर्वक काही कंठकांनी फाडल्याचा संतापजनक प्रकार घडला आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते संतप्त झाले आहेत. सीसीटिव्ही यंत्रणा कार्यान्वित असताना त्याखालील बॅनर फाडण्यात आले आहेत, हा संतापजनक प्रकार असून दोषींना शोधून त्यांच्यावर कारवाई करावी अशी तीव्र मागणी करण्यात येत आहे.

सध्या नवरात्रोत्सव सुरू आहे, या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आलेल्या नागरिकांना आणि भक्त - भाविकांना शुभेच्छा देणारे अनेक बॅनर चांदापुर रोडवर ठिकठिकाणी लावण्यात आले होते. सदरील बॅनर काही राजकीय विरोधकांनी जाणीवपूर्वक फाडले आहेत. राजकीय तंटा वाढवण्याचा त्यांचा स्पष्ट हेतू यातून दिसून येत आहे. असे प्रकार हे वाद वाढवणारे प्रकार असून, ज्यातून सामाजिक शांतता भंग होऊ शकते. त्यामुळे अशा लोकांना वेळीच अवर घालण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत. पुढे चालूनही असे प्रकार त्यांच्याकडून होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ज्यांनी कोणी हे बॅनर फाडण्याचे नालायक कृत्य केले आहे त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी तीव्र मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केली आहे.

## मी दिलेला राजीनामा पक्षाने मंजूर करावा-तुळशीराम पवार

### कार्यकर्त्यांना विचारून पुढील दिशा ठरवणार; लवकरच व्यापक बैठक घेणार



परळी । प्रतिनिधी

१९९४ राजकारण आणि समाजकारण सुरू केले. मागील या कालावधीत मी अनेक तरुणांना व्यसनमुक्त केले. संघटनात्मक काम करीत असताना मी राजकीय भूमिका घेतली. मात्र तिथेही माझे काहीतरी चुकले का? असे मला वाटते आहे. माझा अपमान झाला तरी समोरच्या व्यक्तीचा मी सन्मान केला आणि सन्मान झाला तर सन्मानच झाला. माझ्यावर प्रेम करणारे असंख्य माझी माणसे त्याही वेळेस माझ्या सोबत होते आणि आजही माझ्या सोबत आहेत याचा मला अभिमान वाटतो असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार यांनी केले.

बैठकीत बोलतांना ते पुढे म्हणाले की, मी राजकीय जीवनात निःस्वार्थ काम केले. मी शिवसंग्राम पक्षाचा जिल्हाध्यक्ष होतो. कृषी उद्योग मंडळाचा संचालक होतो. स्व.विनायकराव मेटे यांनी मला नेहमीच जे आशीर्वाद दिले त्यामुळेच माझी राज्यभर ओळख झाली. त्यानंतर २०१९ निवडणुकीच्या वेळेस ना.धनंजय मुंडे यांच्या विनंतीमुळे मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. मात्र मागील चार वर्षांपासून माझी नेहमीच उपेक्षा होत आली आहे. पक्षात कुठल्याही गोष्टीला विचारात घेतले जात नाही. मी राज्य कार्यकारिणीचा सदस्य असताना मला कुठल्याही कार्यक्रमासाठी साधा निरोप दिला जात नाही. मी त्यांच्याकडून कधीही कुठल्या कामाची अपेक्षा ठेवत नाही. कोणाचा द्वेष ठेऊन मी राजकारणात काम करीत नाही. मला छंद आहे म्हणून मी आणि माझ्यासोबत असलेली माणसे राजकारणात आहे.

पुढील काळात काय करायचं हे कार्यकर्त्यांनी घेतलेल्या निर्णयातून ठरविणार आहोत. आजवर एखाद्या छोट्या गोष्टीत माझी लबाडी आढळून आली तर मी राजकीय सन्यास घेऊन शेतात काम करीन. सगळ्या गोष्टी माहीत असताना नेतृत्वाने साधे चर्चा करायला बोलावले नाही. आता मी चर्चेला एकटा येऊ शकतं नाही. मीटिंगला आलेले सर्वजण सोबत घेऊनच चर्चा करीन. मला दिलेल्या पक्षाच्या पदावर काम करण्याची मला इच्छा नाही. मी दिलेला राजीनामा माघार घेणार नाही, त्यांनी माझा राजीनामा मंजूर करावा. बैठकीला उपस्थित असलेले सर्वजण जर म्हणतील तर मी पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा द्यायला आणि पक्ष सोडायला तयार आहे अशी घोषणा तुळशीराम पवार यांनी केली. एका सभागृहात बोलावण्यात आलेल्या बैठकीस शेकडो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

मागील ३० ते ३५ वर्षे मी राजकारण आणि समाजकारणात आहे. माझ्यासोबत असलेले असंख्य कार्यकर्ते ज्याप्रमाणे सामान्य घरातील आहेत तसाच मीही सामान्य कार्यकर्ता आहे. विना अपेक्षा मी आजवर सच्चा मनाने काम केले. मात्र जर आमचा स्वाभिमान दुखावला जात असेल तर प्रचलित म्हणीप्रमाणे मोडके मुसळ सुद्धा उतरंडीला भरी असते याप्रमाणे आम्हाला भूमिका घ्यावी लागणार असल्याचेही तुळशीराम पवार म्हणाले.

## राजेभाऊ फड यांच्यामुळे चोपनवाडी प्रकाशमय; ग्रामस्थांनी मानले आभार

परळी । प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघातील चोपनवाडी हे छोटेसे गाव मागील दोन वर्षांपासून अंधारात होते. गावांतर्गत रस्त्यांवर नेहमीच अंधार पसरलेला असायचा. महिला आणि मुलांना या अंधाराचा प्रचंड त्रास होत असल्याने युवा कार्यकर्ते सोपानराव तोंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांना याबाबत लक्ष घालण्याची विनंती केली. यावर क्षणाचाही विलंब न करता गावातील रस्ते त्यांनी पथदिवे बसवून प्रकाशमय केले. ''फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश'' या काव्यपंक्ती प्रमाणे अंधरापासून गावाची सुटका होऊन सर्वत्र प्रकाश झाला आहे. याबद्दल ग्रामस्थांकडून आभार व्यक्त केले जात आहेत.



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी जनसंपर्क अभियान हाती घेतले असून, मतदारसंघातील गावागावात जाऊन ते नागरिकांच्या समस्या ऐकून घेऊन त्यावर तात्काळ उपाययोजना करीत आहेत. चोपनवाडी येथे नागरिकांशी संवाद साधत असताना सोपानराव तोंडे यांनी गावात गेली दोन वर्षांपासून अंधाराचे साम्राज्य पसरले असल्याची बाब त्यांच्या कानावर घातली. क्षणाचाही विलंब न करता राजेभाऊ फड यांनी गावातील सर्व रस्त्यांवर पथदिवे बसवून घेतले. यामुळे अंधाराचे साम्राज्य पसरलेले चोपनवाडी हे गाव प्रकाशमय झाले. याबद्दल नवनाथ कराड, रामचंद्र बडे, राजेभाऊ भेंडेकर, माणिक बडे, आत्माराम बडे व ग्रामस्थांकडून त्यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

## घटस्थापनेनिमित्त डॉ.अंजलीताई घाडगे यांनी घेतले योगेश्वरी देवीचे दर्शन

### शारदीय नवरात्र उत्सवाची सुरूवात



अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे शक्तिपीठ व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अंबाजोगाई येथील योगेश्वरी देवीच्या शारदीय नवरात्र उत्सवाची सुरूवात झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या डॉ.अंजलीताई घाडगे यांनी घेतले योगेश्वरी देवीचे दर्शन घेतले. मान्यवरांच्या उपस्थितीत घटस्थापना होऊन शारदीय नवरात्र उत्सवाची सुरूवात करण्यात आली.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या डॉ.अंजलीताई घाडगे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. शारदीय नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर बोलताना डॉ.अंजलीताई घाडगे यांनी सांगितले की, कोकणवासीयांची कुलदेवता अशी माता योगेश्वरी देवीची ओळख असल्याने राज्यभरातील भाविक तर दर्शनासाठी येत असतात याचबरोबर परराज्यातील भाविक देखील मोठ्या प्रमाणात अंबाजोगाई या ठिकाणी दर्शनासाठी येतात. नवरात्र उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांची आयोजन करण्यात येते. भाविकांसाठी भजन संध्या, भक्ती गीते, प्रवचन असे अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. आपण नवरात्र उत्सवानिमित्त माता योगेश्वरी देवीचे दर्शन घेतले अशी माहिती डॉ.घाडगे यांनी दिली.

## दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांची गैरसोय टाळा-प्रविण ठोंबरे

### तहसीलदार व देवल कमिटीला संभाजी ब्रिगेडचे निवेदन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्यासह शहर व तालुक्यातून श्री माता योगेश्वरी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांची गैरसोय टाळा, दर्शनाशस्थळी सर्व भाविक भक्तांना समान दृष्टीने पहावे अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांनी अंबाजोगाईचे तहसीलदार व देवल कमेटीला संभाजी ब्रिगेडच्या वतीने शुक्रवार, दिनांक ४ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.



सदरील निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, श्री माता योगेश्वरी देवस्थान मंदिरामध्ये देवीच्या दर्शनसाठी येणाऱ्या सर्व भाविक भक्तांची माता योगेश्वरी देवस्थान कमेटीकडून गैरसोय होत आहे. व सर्व भक्तांना दर्शनासाठी समान न्याय दिला जात नाही. पोलीस प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. पोलीस प्रशासनाचे कर्मचारी निवांत खुर्चीवर बसुन राहत आहेत. सामान्य भाविक भक्तांना कोणीही वाली नाही, सामान्य जनतेसाठीच दर्शानाची रांग आहे. तर तथाकथित मोठ्या लोकांना अजिबात रांगेत उभे राहण्याची गरज नाही असे दिसून येत आहे. यामुळे सामान्य जनतेला याचा खूप मोठा त्रास सहन करावा लागतोय. त्याची खबरदारी श्री योगेश्वरी देवस्थान कमेटी व पोलीस प्रशासनाने घ्यावी. अन्यथा संभाजी ब्रिगेडकडून याप्रश्नी आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे, जिल्हा उपाध्यक्ष, परमेश्वर मिसाळ, जिल्हा सचिव नारायणराव मुळे, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष केशव टेहरे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अश्विनी यादव, तालुकाध्यक्ष सुनंदा लोखंडे, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष सिद्राम यादव, विद्यार्थी आघाडीचे तालुकाध्यक्ष सतिश कुंडगर, शहराध्यक्ष रोहन कुलकर्णी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## प्रा. डॉ. शैलजा बरुरेंचा सत्कार, नवरात्र उत्सवात महिलांचा सन्मान



अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील स्वाभिमान संघटनेच्या वतीने नवरात्र उत्सवात ९ दिवस विविध समाजातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्याचे ठरवले होते. त्यानुसार गुरुवारी (ता.३) प्रा. डॉ. शैलजा बरुरे यांचा सन्मान केला.या सन्मानाचे स्वरूप शाल, फेटा व योगेश्वरी देवीची प्रतिमा असे होते. पत्रकार प्रशांत बर्दापूरकर यांच्या हस्ते प्रा. डॉ. शैलजा बरुरे यांचा हा सन्मान करण्यात आला. यावेळी स्वाभिमान संघटनेचे पदाधिकारी मनोज कदम यांच्यासह त्यांचा मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

सन्मान मातेचा, स्त्री शक्तीचा, सन्मान स्त्री कर्तृत्वाचा असा हा उपक्रम या संघटनेचा आहे. प्रा. डॉ. शैलजा बरुरे यांचे शैक्षणिक क्षेत्रात असलेले योगदान आणि विद्यार्थी घडवण्याबरोबरच व्याख्यानातून मांडलेल्या विचारातून समाज जागृती होत आहे. एक महिला असूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील विविध पदावर त्या कार्यरत आहेत. योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात त्या राज्यशास्त्र विभाग प्रमुख आहेत. अशा या कर्तृत्ववान महिलेचा आम्ही पहिला सत्कार केल्याचे मनोज कदम यांनी सांगितले.

## धर्मादाय आयुक्ताने नवीन कार्यकारीणीला दिली मान्यता

### अध्यक्ष बाळासाहेब देशमुख, उपाध्यक्ष अरूण अर्धापुरे, सचिव अमर देशमुख

परळी । प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात नावलौकिक असलेल्या मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापक कार्यकारीणीच्या कुटूंबातील सदस्यांना तब्बल १३ वर्षानंतर न्यायालयीन लढ्यात यश प्राप्त झाले आहे. दरम्यान धर्मादाय आयुक्त, बीड यांनी सोसायटीच्या नवीन कार्यकारीणीला कामकाज करण्यासाठी मान्यता दिली असून नवीन कार्यकारीणी पुढील प्रमाणे अध्यक्ष बाळासाहेब देशमुख, उपाध्यक्ष अरूण अर्धापुरे, सचिव अमर देशमुख आदींची निवड झाली आहे.

कै.राजेसाहेब देशमुख व प्रा.माधवराव अर्धापुरे या दोघांनी मिळून १९७१ साली मॉडर्न एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. या सोसायटीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील मुलांना इंग्रजी शिक्षण मिळावे म्हणून लिट्ल फ्लॉवर इग्लिश स्कुल ही शाळा सुरू केली. विशेष म्हणजे बीड जिल्हयातील पहिली इग्लिश स्कुल म्हणून या शाळेची इतिहासात नोंद आहे. तसेच लिट्ल फ्लॉवर कनिष्ठ महाविद्यालय, व्यावसायिक अभ्यासक्रम महाविद्यालय असे ३ युनिट सुरू आहेत. या सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष राजेसाहेब देशमुख, सचिव प्रा.माधवराव अर्धापुरे, भानुदासराव देशमुख, मंचकराव देशमुख, प्रभुअप्पा हालगे, महेशअप्पा खानापुरे, डॉ.शामराव ढाकणे, सुधाकरराव देशमुख, सुवालालजी वाकेकर, मदनलालजी वाकेकर, नंदकिशोरजी जाजू, ही कार्यकारीणी होती. यामध्ये काही जणांचा मृत्यू झाल्यानंतर २००६ रोजी अमर राजेसाहेब देशमुख (अध्यक्ष) भानुदासराव देशमुख (उपाध्यक्ष), राजेश विठ्ठलराव देशमुख (सचिव), बाळासाहेब (अंनत) मंचकराव देशमुख (कोषाध्यक्ष) राजेसाहेब देशमुख (सहसचिव) ही कार्यकारीणी झाली होती नंतर अंतर्गत वाद झाल्यामुळे २०११ साली न्यायालयात वाद गेला. २०२४ रोजी न्यायालयामध्ये (धर्मादाय आयुक्त) संस्थापक कार्यकारणीच्या कुंटूबातील सदस्यांनी न्याय मागणीसाठी पुरावे दाखल केले होते या पुराव्याच्या आधारे १३ वर्षानंतर त्यांना न्यायालयीन लढ्यात यश आले. दि.०८ सप्टेंबर २०२४ रोजी सोसायटी सदस्यांच्या मागणीनूसार सोसायटीने निवडणूक प्रक्रिया करून नवीन कार्यकारीणी निवडली असून त्यांचा प्रस्ताव धर्मादाय आयुक्ताकडे दाखल केला होता. धर्मादाय आयुक्तांनी सदरील कार्यकारीणीला कामकाज करण्यासाठी मान्यता दि.३० सप्टेंबर २०२४ रोजी दिली. या न्यायालयीन लढ्यामध्ये ॲड.राम औटे, ॲड.मेहुल तोतला यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

### १३ वर्षे बेकायदेशीर कारभार

मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचा १३ वर्षे बेकायदेशीर कारभार झाला असून सदरील कारभार सन २०११ ते २०२४ या दरम्यान झाला आहे. हा कारभार १ विरूध्द १२ असे असताना एकाकी हुकूमशाहीच्या पध्दतीने सोसायटीचा कारभार सुरू होता. या कारभारा विरोधात संस्थापक कार्यकारीणी कुंटूबातील सदस्यांनी न्यायालयात धाव घेतली असता त्यांना या न्यायालयीन लढ्यात यश आले.

### देशमुख व अर्धापुरे यांचे स्वप्न साकार

मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष राजेसाहेब देशमुख सचिव प्रा.माधवराव अर्धापुरे यांचे आज रोजी स्वप्न साकार झाले असून त्यांच्याच कुंटूबातील सदस्याकडे सोसायटीचा कारभार गेल्यामुळे संस्थेला गत वैभव प्राप्त होणार आहे.

### नवीन कार्यकारिणी

अध्यक्ष बाळासाहेब (अनंत) मचकराव देशमुख, उपाध्यक्ष प्रा.अरूण माधवराव अर्धापुरे, सचिव अमर राजेसाहेब देशमुख, कोषाध्यक्ष अनिल शेषेराव चव्हाण, सहसचिव चंद्रकांत बाबुअप्पा कोरे, सदस्य रमेश हरिश्चंद्र पाटील, दत्तात्रय गोविंदराव शिंदे, यांची निवड झाली आहे. यावेळी सोसायटीचे सभासद नरेश प्रभुअप्पा हालगे, पंकज शरदराव लोमटे, चंद्रप्रकाश प्रभुअप्पा बुरांडे, ॲड.अजिक्य प्रकाशराव देशमुख, विजय राजेसाहेब देशमुख आदी उपस्थित होते.

## कब्रस्तानमध्ये भारतीय सेनादलाच्या इको बटालियनकडून वृक्षारोपण



धारूर । प्रतिनिधी

भारतीय सेना दलाच्या पर्यावरणवादी १३६ इको बटालियनच्या बी कंपनी व एतेहाद एकता ग्रुपच्या वतीने आज दि.६ रविवार रोजी शहरातील गुलाबशाह कब्रस्तान परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

भारतीय सैन्य दलाच्या पर्यावरणवादी १३६ को बटालियन बी कंपनी तालुक्यातील विविध शासकीय व सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करत आहे. आज दि.६ रविवारी शहरातील गुलाबशाह कब्रस्तानमध्ये एतेहाद (एकता) ग्रुपच्या मदतीने वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सैन्य दलाच्या कार्याचे कौतूक करत एतेहाद ग्रुपकडून सैन्य अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पत्रकार सय्यद शाकेर यांनी इको बटालियनच्या कार्याची माहिती दिली. या कार्यक्रमासाठी ले.कर्नल अमित प्रभु यांच्या मार्गदर्शनाखाली सुभेदार नाईक दिवेकर , हवालदार शेख जलील, संदीप ठोसळ, हवालदार दादा मंडल, सैनिक जाधव, संतोष काशिद, निवृत्त सुभेदार हाजी सय्यद इस्माईल, ज्येष्ठ पत्रकार सय्यद शाकेर, अफसर तांबोळी, सय्यद पाशा, आमेर तांबोळी, डिस्कव्हरीचे संचालक सय्यद अखिल यांच्यासह एतेहाद ग्रुपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साडेपाच वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या शिक्षकाला अटक

## आरोपीला चार दिवसांची पोलीस कोठडी; संतप्त पालकांकडून आज माजलगाव बंदची हाक

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

दोन दिवसापूर्वी माजलगावातील एका शाळेत अल्पवयीन साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना घडली होती.या चिमुकलीवर शाळेतीलच एका शिक्षकानेच अत्याचार केल्याचे उघड झाले.या प्रकरणी नराधम शिक्षक राहुल अंबादास वायखिंडे याला पोलिसांनी दि ०५ ऑक्टोबर मध्यरात्री शहरातील राहत्या घरातुन अटक केली.

राज्यात शाळकरी मुलींवरील अत्याचाराच्या घटनांची मालिका सुरूच असून, माजलगाव येथील एका शाळेतील बालवाडीत शिकणाऱ्या साडेपाच वर्षाच्या मुलीवर अत्याचार केल्याची घटना दि २५ ते दि २८ सप्टेंबर दरम्यान घडली होती.या घटनेप्रकरणी मुलीच्या पालकांच्या तक्रारीवरून दि ०३ ऑक्टोबर गुरूवार रोजी अज्ञात व्यक्ती विरोधात लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.या घटनेचे गांभीर्य ओळखून उपविभागीय पोलिस अधिकारी धीरजकुमार बच्चू व पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्यासह पोलीस उपनिरीक्षक सुनील दिंडे यांनी सदरील शाळेची चौकशी करून तेथील सीसीटीव्हीची तपासणी केली तसेच या शाळेतील सर्व शिक्षकांची ओळख परेड घेतली तसेच शिक्षकांच्या फोटोमधून सदरील चिमुरडीने आरोपी शिक्षकाचा फोटो पाहून त्याची ओळख पटवली. त्यानंतर पोलिसांनी संबंधित शिक्षक राहुल अंबादास वायखिंडे (सध्या रा.माजलगाव,मूळ रा. ब्रह्मगाव ता.कोपरगाव जि.अहमदनगर) हमयास दि ०५ ऑक्टोबर शनिवार रोजी रात्री उशिरा राहात्या घरातुन अटक केली आहे.

◀◀ पान ३ वर



### आजच्या मार्चात सहभागी व्हा

विषय दुसऱ्या चा नाही तुमच्या आमच्या लेकीला न्याय मिळण्यासाठी माजलगावकरच्या वतीने माजलगाव बंद व मोर्चा आज सकाळी १० वाजता हनुमान चौक येथुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक ते तहसील कार्यालय येथे तहसीलदार साहेब यांना निवेदन देण्यात येणार आहे तरी आपल्या लेकीला न्या देण्यासाठी सर्व माजलगावकरांनी उपस्थित रहावे.

माणुसकीला काळीमा फासणाऱ्या दुर्दैवी घटनेचा निषेध करावा तेवढा कमी आहे.माजलगाव येथे साडे पाच वर्षाच्या चिमुकल्या मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या दोषींवर कडक कारवाई व्हावी आणि महिला,मुलींवर वाढत चाललेल्या अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ माजलगावकरांच्यवतीने दि.०७ ऑक्टोंबर २०२४ रोजी माजलगाव बंदचे आवाहन करण्यात आले.आपण सर्वांनी या बंद मध्ये सहभागी होऊन निषेध नोंदवावा.या घटनेतील आरोपींना तातडीने अटक करावी आणि कुठल्याही दबावाला बळी न पडता पारदर्शक तपास करावा अशा सूचना पोलीस प्रशासनाला दिल्या आहेत.



आ.प्रकाश सोळंके,

### चिमुकली आजारी पडल्याने समोर आली अत्याचाराची घटना

माजलगाव शहरातलगत असणाऱ्या एका खाजगी बालवाडी आहे. त्यामध्ये परिसरातील लहान मुले मुली दररोज येतात या परिसरातीलच एक साडेपाच वर्षाची चिमुरडी नियमित शाळेत येते तिला शाळेतील एका अज्ञात इसमाने दि .२५ ते २८ सप्टेंबर रोजी डबा खाल्यानंतर अत्याचार केला. घटनेनंतर चिमुरडी ताप येऊन आजारी पडली त्यामुळे तिला दवाखान्यात उपचार करण्यात आले.घरी आल्यावर तिने शाळेत झालेली ही गोष्ट आपल्या पालकांना सांगितली.

### चिमुकली म्हणाली, त्या माणसाला मी ओळखते

पांढरे कपडे घातलेला माणसाला मी ओळखते असे चिमुकलीने तिच्या आईवडिलांना सांगितले.या घटनेनंतर चिमुरडीच्या पालकांनी माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुरूवारी तक्रार दिली त्यानुसार अज्ञात व्यक्ती विरुद्ध बाललैंगिक अत्याचार पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.या घटनेनंतर पोलिसांनी सदरील अल्पवयीन मुलीची अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केली होती.

---

### भविष्यात या मातीत उत्कृष्ट खेळाडू घडावेत

# माजलगाव मतदारसंघाच्या नावाचा अटकेपार झेंडा सातासमुद्रापार न्यावा - आ.प्रकाश सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव मतदारसंघाचा चौथ्यांदा लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आल्या नंतर या मतदारसंघासाठी सातत्याने विविध विकास कामांसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करत आलो.त्याचच यश म्हणून माजलगाव आणि वडवणी या दोन्ही ठिकाणी क्रीडा संकुलास मंजुरी मिळाली नौतर दि ०६ ऑक्टोबर रविवार रोजी माजलगाव व वडवणी या दोन्ही ठिकाणीच्या क्रीडा संकुलाचे भव्य असं भूमिपूजन समारंभ आ.प्रकाश सोळंके यांच्या हस्ते संपन्न झाला.यावेळी बोलताना आ.सोळंके म्हणाले की,खेळांचे आकर्षण असणाऱ्या तरुणांच्या दृष्टीने क्रीडा संकुले उपयोगास येतील. या मातीत उत्कृष्ट खेळाडू भविष्यात घडावेत व या मतदारसंघाच्या नावाचा अटकेपार झेंडा सातासमुद्रापार न्यावा ही भावना या वेळी आ.सोळंकै यांनी व्यक्त केली.

मतदार संघातील माजलगाव व वडवणी या दोन्ही तालुक्यातील क्रीडा प्रेमींसाठी,खेळांचे



आकर्षण असणाऱ्या तरुणांच्या दृष्टीने हि दोन्ही क्रीडा संकुले उपयोगास येतील.या क्रीडा संकुलात उत्कृष्ट खेळाडू भविष्यात घडावेत व माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या नावाचा अटकेपार झेंडा साता समुद्रापार न्यावा ही भावना या वेळी आ.प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केली.क्रीडा संकुलाचे काम सुरू झाल्या नंतर दर्जेदार आणि उत्कृष्ट काम व्हावे.अशा सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना आ.सोळंके यांनी यावेळी दिल्या.

---

# श्री स्वामी समर्थ केंद्रामार्फत कडा शहरात मोफत आरोग्य शिबिर

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, सद्गुरु परमपूज्य मोरे यांचा चॅरिटेबल हॉस्पिटल अँड मेडिकल ट्रस्ट, श्री स्वामी समर्थ सेवा खंड दिंडोरी प्रणित शाखा यांच्या संयुक्त विद्यमानाने आष्टी तालुक्यातील कडा येथील केंद्रात दि.१० ऑक्टोबर रोजी आरोग्य शिबीर व मोफत आरोग्य तपासणी, नाडीदोष परीक्षण तसेच सर्व रोग निदान शिबीर तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन बापु जगताप, मनिषा पवळ,स्वाती भोसले, शिल्पा भगत,राणी वेदपाठक, गायत्री बहिर सह आयोजकांमार्फत करण्यात आले आहे.

तालुक्यातील कडा शहरात दि. १० ऑगस्ट रोजी श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक बालविकास संस्कार केंद्र (दिंडोरी प्रणित) गजानन कॉलनी कडा,तालुका आष्टी जिल्हा, बीड ..

मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात श्रीस्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर येथील डॉ. पाटील, डॉ. गौरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हृद्यविकार, मधुमेह, ब्लडप्रेशर, काविळ, पोटाचे विकार, ॲनिमिया, संधीवात, मुतखडा, मनोविकार, स्त्रीयांचे आजार, त्वचारोग, दंत विकार, गर्भाशयाचा कॅन्सर, मूळव्याध, लहान मुलांचे आजार यासह सर्व जुनाट आजारांवर मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

---

# क्रांती नाना माळेगांवकर यांच्या होम मिनिस्टर कार्यक्रमाला उपस्थित रहा - जयश्री विधाते

**बीड । प्रतिनिधी**

जयदत्तजी आण्णा क्षीरसागर विचार मंच महीला आघाडी बीड विधानसभा यांच्या संकल्पनेतून काकु - नाना प्रतिष्ठान बीड आयोजित महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध क्रांती नाना माळेगांवकर यांच्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी खेळ पैठणीचा या कार्यक्रमाचा मुख्य कार्यक्रम दि. ७ ऑक्टोबर ०२४ सायंकाळी ५ - ३० सोनाजीराव क्षीरसागर मेडीकल कॉलेज (बी एच एम एस कॉलेज);विद्या नगर पश्चिम बीड. येथे आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमात शहराच्या विविध भागात बीडचे भुमीपुत्र सुरेश सोळुंके (भाऊजी) यांच्या निवेदनातून साकारलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी या खेळात सहभागी होऊन प्रथम द्वितीय तृतीय बक्षीसा चे मानकरी आणि इतर सात जणी अशा साधारण २०० स्पर्धकांना या मुख्य कार्यक्रमात सहभागी होता येणार आहे. या स्पर्धेतील प्रथम विजेत्याला बक्षीस स्वरूपात येवला पैठणी आणि चंपावती सम्राज्ञी हा खिताब देऊन सन्मानित करण्यात येणार आहे तर. दुसऱ्या विजेत्याला बक्षीस स्वरूपात पेशवाई पैठणी, तर तिसऱ्या बक्षीस स्वरूपात विजेत्याला बनारसी पैठणी देऊन गौरविण्यात येणार आहे.



या सह सात जणींना आकर्षक बक्षीस देण्यात येणार असून कार्यक्रमाला उपस्थित राहाणाऱ्या सर्व भगीनींना आकर्षक गिफ्ट देण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्तजी आण्णा क्षीरसागर साहेब यांच्या शुभहस्ते होणार असून प्रमुख अतिथी म्हणून प्रियाताई महेंद्रे यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. आशा हास्य मनोरंजन खेळांनी ओतप्रोत भरलेल्या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाला बीड शहरातील जास्तीत जास्त भगीनींनी सहभागी होऊन आनंद द्विगुणित करावा असे आवाहन जयदत्तजी आण्णा क्षीरसागर विचारमंच महीला आघाडी बीड विधानसभा प्रमुख सौ. जयश्री विलास विधाते यांनी केले आहे.

---

# तरुणांना रोजगार मिळवून देणारे अभ्यासक्रम आणण्यासाठी आग्रही -डॉ.योगेश क्षीरसागर

## नाळवंडी येथे भाऊसाहेब डावकर यांच्या पुढाकारातून ४० शाळांना संगणक वाटप

**बीड । प्रतिनिधी**

देशभरात नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होत आहे. स्पर्धेच्या युगात आपल्या विद्यार्थ्यांना टिकायचे असेल तर दर्जेदार शिक्षण देणे काळाची गरज बनली असून ती आपली जबाबदारी आहे. आपल्या शिक्षण संस्थांमध्ये तरुणांना रोजगार मिळवून देणारे विविध अभ्यासक्रम आणण्यासाठी आपण कायम आग्रही असतो, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले आहे.



बीड तालुक्यातील नाळवंडी येथील निवासी आश्रमशाळेत शुक्रवारी (दि.५) जिल्हा परिषद गटातील ४० शाळांना संगणक संच वाटपाचा कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच ॲड.राजेंद्र राऊत हे होते. व्यासपीठावर अरुण लांडे, सुधीर काकडे, पंचायत समितीचे माजी सदस्य अच्युतराव शेळके, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, युवा नेते अशोक वाघमारे, माजी नगरसेवक रमेश चव्हाण, सुनिल सुरवसे, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, माजेद कुरेशी, सरपंच भारत कानडे, सरपंच रवी गंगावणे, सरपंच तेजाब चव्हाण, अशोक वैद्य, बाबासाहेब शिंदे, शाम राऊत, बाळासाहेब डोळस, संजय काळे, बाळराजे राठोड, भगीरथ बांडे, मिलिंद ठोकळ, अभिमान गुंदेकर, प्रा.अमोल ◀◀ पान ३ वर

---

# भविष्यात प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाचे महत्व वाढणार -एस.एम.देशमुख

## चुकीला चूक म्हणण्याची भूमिका पत्रकारांनी ठेवावी -बदामराव पंडित

गेवराई । प्रतिनिधी

समाजात घडणाऱ्या चुकीच्या गोष्टी आणि राज्यकर्त्यांच्या विरोधात लोकहितासाठी भूमिका मांडण्याचे काम पत्रकारांचे आहे यासाठी प्रिंट मीडिया जितका महत्त्वाचा आहे तितकाच महत्त्वाचा भविष्यात डिजिटल मीडिया असणार आहे. त्यामुळे पत्रकारांनी डिजिटल मीडियामध्ये अधिक सक्रिय व्हावे असे आवाहन अभा मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी केले आहे. सत्ताधाऱ्यांचे चुकत असेल तर




प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे यांचा सत्कार

ते चूक म्हणण्याची भूमिका पत्रकारांनी ठेवावी आणि जनतेचा आवाज होऊन प्रिंट मीडिया आणि डिजिटल मीडियाने काम करावे असे आवाहन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

गेवराई येथील शासकीय विश्रामगृह येथे दिनांक ६ ऑक्टोबर २०२४ रोजी अभा मराठी पत्रकार परिषदेची सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या वतीने मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मीडिया परिषदेच्या सदस्यांचा मेळावा आणि नूतन पदाधिकारी सत्कार सोहळ्याची आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी कार्यक्रमा अध्यक्ष म्हणून एस एम देशमुख बोलत होते. या कार्यक्रमास शिवसेना ◀◀ पान ३ वर

---

# अनिलदादांच्या होम मिनिस्टर स्पर्धेत हजारो महिला-भगिनींना मिळाले मनोरंजनाचे जम्बो पॅकेज!

## अनिलदादा यंदा आमदार व्हा; उपस्थित महिला भगिनींची आर्तहाक

### नारीशक्तीचा सन्मान हेच बाळासाहेबांचे संस्कार- अनिलदादा जगताप

बीड । प्रतिनिधी

तीनशे पासष्ट दिवस चोवीस तास आपल्या कौटुंबिक जबाबदारीवर तत्पर असणाऱ्या महिला भागिनींना एक विरुंगुळा मिळावा या उदात्त हेतूने

शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल मामा जाधव यांनी काल दि. ५ ऑक्टोबर रोजी बीड शहरातील रामकृष्ण लॉन्स येथे होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा आगळा-वेगळा कार्यक्रम वजा स्पर्धा घेतली. या स्पर्धेमध्ये बीड शहर-ग्रामीण भागातील हजारोच्या संख्येने महिला-भगिनी मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. अत्यंत देखण्या आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमात महिला भगिनीं आमच्या दादांचा कार्यक्रमा म्हणजे नो प्रॉब्लेम असं म्हणत धमाल उडवली. गप्पा-गोष्टी, गाणी-उखानी, खेळ, मौज-मज्जा आणि भरपूर मनोरंजन करत लाडक्या बहिणींनी मनमुराद आनंद लुटाला. यादरम्यान हजारोंच्या संख्येने उपस्थित असणाऱ्या महिला-भगिनीं अनिलदादा यांची भेट घेऊन अनिलदादा यंदा तुम्ही आमदार व्हा, अशी आर्तहाक देत इच्छा व्यक्त करत होत्या. नारीशक्तीचा सन्मान हा संस्कार हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर




आनंद दिघे साहेब यांनी आम्हा शिवसैनिकांवर बिंबवलेला आहे. याचमुळे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री ◀◀ पान ३ वर

---

# जिल्हास्तरीय मैदानी क्रिडा स्पर्धेत भागूजीराव ढेकळे विद्यालयाच्या खेळाडूंचे यश

**गेवराई । प्रतिनिधी**

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागूजीराव ढेकळे विद्यालयाच्या दोन खेळाडूंनी जिल्हा पातळीवरील मैदानी क्रिडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे.





युवक सेवा संचालनालय पुणे आणि जिल्हा क्रिडा कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी क्रिडा स्पर्धेत १७ वर्ष वयोगटात दाभाडे शिवदत्त अनिरूद्र ४०० मिटर धावणेमध्ये प्रथम क्रमांक मिळाला असुन त्याची विभागीय मैदानी क्रिडा स्पर्धेसाठी निवड झाली व १९ वर्ष वयोगटात कु.जाधव क्रांती मारोती या विद्यार्थीनीने १०० मीटर, ८०० मीटर धावणेमध्ये प्रथम क्रमांक. गोळाफेकमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. या दोन्ही खेळाडूंची विभागीय मैदानी क्रिडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सदर खेळाडूंना क्रिडा शिक्षक आर.डी.घोरड यांचे मार्गदर्शन लाभले. मैदानी क्रिडा स्पर्धेत मिळवलेल्या यशाबद्दल आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, कार्यवाहक एम.ए.राऊत, कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए.एस, पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, राजेंद्र सोनवणे, अरूण कळासे, सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

सोमवार, दि.७ ऑक्टोबर २०२४ । पान ७

# खाऊ गल्लीचा मुहूर्त लांबणीवर




**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने इंदूर शहराच्या धर्तीवर आकुर्डी रेल्वे स्टेशनसमोरील मोकळ्या जागेत प्रशस्त अशी खाऊ गल्ली (फुड मॉल) सुरू केली आहे. ही खाऊ गल्ली बांधून तयार झाली आहे. मात्र तेथील टपऱ्या भाडेतत्त्वावर देण्यास महापालिका प्रशासनाकडून चालढकल केली जात आहे. त्यामुळे खाऊ गल्लीस मुहूर्त कधी लागणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. इंदूर शहराच्या धर्तीवर तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांनी खाऊ गल्लीची संकल्पना आणली.

आकुर्डी रेल्वे स्टेशनच्या मोकळ्या जागेत महापालिकेने पहिली खाऊ गल्ली बांधली आहे. त्यासाठी ३ कोटी ७० लाख २३ हजार ६०३ रुपये खर्च करण्यात आला आहे. तेथे एकूण ४९ गाळे आहेत. त्याचा आकार १९० चौरस फूट आहे.

खाऊगल्लीची निविदा डिसेंबर २०२२ मध्ये काढण्यात आली. त्याचे काम दीड वर्षानंतर पूर्ण झाले आहे. बांधकाम तसेच विद्युत विभागाने काम पूर्ण झाल्याचे भूमि आणि जिंदगी विभागास मार्च २०२४ मध्ये कळविले आहे. हे गाळे भाडे तत्त्वावर द्यावयाचे आहेत. त्याचा प्रस्ताव आयुक्तांसमोर ठेवण्यात आला आहे. त्यांची मान्यता मिळालानंतर ते गाळे भाडे तत्त्वावर देण्यात येणार आहेत; मात्र त्या कामकाजासाठी चालढकल केली जात असल्याने तयार झालेले गाळे धूळखात पडून आहेत.



# दुचाकीच्या धडकेत देवी भक्त ठार

दौंड : कुरकुंभ (ता. दौंड) येथील श्री फिरंगाई देवीच्या दर्शनासाठी पायी निघालेल्या भक्ताचा दुचाकीने धडक दिल्याने मृत्यू झाला. कुरकुंभ-दौंड रस्त्यावरील (नर्सरी) रोपवाटीकेसमोर रविवारी (दि. ६) पहाटे पाच ते साडेपाच वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. नाना सुर्यभान जाधव (वय ३९, रा. सरपंचवस्ती दौंड) असे मृताचे नाव आहे. तर रोशन राजेंद्र शेवाळे (वय २४, सध्या रा. बोरावकेनगर दौंड) हा दुचाकीस्वार जखमी झाला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, नाना जाधव व त्यांचे इतर सहकारी चालत कुरकुंभ-दौंड रस्त्यावरून कुरकुंभच्या श्री फिरंगाई देवीच्या दर्शनासाठी पहाटे निघाले होते. रोशन शेवाळे हा दुचाकीवरून कुरकुंभ एमआयडीसीतील कंपनीत कामाला जात होता. यादरम्यान त्याच्या दुचाकीने पायी जाणाऱ्या जाधव यांना पाठीमागून धडक दिली. या अपघातात जाधव याचा मृत्यू झाला. तर रोशन शेवाळे जखमी झाला असून त्याला दौंड येथील खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# भजनसम्राट पद्मश्री अनुप जलोटा यांची पुण्यात प्रथमच रंगणार दिवाळी पहाट

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यामध्ये दिवाळी पहाट कार्यक्रम सादर करण्याची परंपरा १९९१ मध्ये पुण्यभूषण फाउंडेशनने सुरू केलेल्या दिवाळी पहाटपासून आजतागायत गेल्या ३३ वर्षांपासून सुरू आहे. यंदाची दिवाळी पहाट मात्र समस्त पुणेकर रसिकांसाठी आगळीवेगळी ठरणार आहे. कारण या वर्षी 'पुढारी' माध्यम समूहाने भजनसम्राट, प्रसिद्ध गायक पद्मश्री अनुप जलोटा यांची सूरमयी दिवाळी पहाट आयोजित केली आहे. पुण्यात आयोजित केल्या जाणाऱ्या दिवाळी पहाट कार्यक्रमात श्री. अनुप जलोटा प्रथमच सहभागी होत आहेत.



पुणे हे विद्येचे माहेरघर, महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी. वर्षभर पुण्यात अनेक सण आनंदाने, उत्साहाने साजरे होत असतात. याच सणांमधील दिवाळी पहाट हा पुणेकरांसाठी खूप उत्साहाचा आणि विविधतेने नटलेला सोहळा असतो. विविध ठिकाणी दिवाळी पहाटनिमित्त अनेक कार्यक्रम साजरे केले जातात. अशा कार्यक्रमांच्या निमित्ताने सांगीतिक मैफिलींचा आस्वाद घेण्याची संधी उपलब्ध होत असते. राज्याची सांस्कृतिक राजधानी असलेले पुण्यातील नागरिक अशा दिवाळी पहाट कार्यक्रमांची आतुरतेने वाट पाहात असतात. कार्यक्रमात कोण सादरीकरण करणार हे पाहून पुणेकर त्यांची कार्यक्रमपत्रिकाही तयार करतात. पुणेकरांची ही सांस्कृतिक भक्ती जपण्यासाठी 'पुढारी' माध्यम समूहाने गेली ५० वर्षे तमाम रसिकांना आपल्या भक्तिसंगीताच्या भजन स्वरांनी मंत्रमुग्ध करण्याचा मापदंड गाठणारे प्रसिद्ध गायक, भजनसम्राट पद्मश्री अनुप जलोटा यांची दिवाळी पहाट आयोजित केली आहे. आजपर्यंत अनेक कलाकारांनी आपल्या गायकीने, संगीताने पुण्यात दिवाळी पहाट कार्यक्रम सादर केले आहेत. पण पद्मश्री अनुप जलोटा हे मात्र पुण्यात पहिल्यांदाच दिवाळी पहाट कार्यक्रम सादर करणार आहेत. भजन गायक पुरुषोत्तमदास जलोटा यांचे पुत्र असणारे अनुप जलोटा हे पंजाबमधील प्रसिद्ध शाम चौरासी घराण्यातील गायक आहेत. ऑल इंडिया रेडिओवर त्यांनी आपल्या गायकीची सुरुवात केली. त्यांच्या सादरीकरणाने तसेच श्रवणीय भजनांमुळे भक्तिसंगीत विश्वातील एक अढळ तारा म्हणून आपले स्थान मिळवले आहे.

# अमोल बालवडकरांचे जोरदार शक्तिप्रदर्शन, चंद्रकांत पाटलांविरुद्ध दंड थोपटले

पुणे । प्रतिनिधी

ज्यांच्यासाठी तन मन धन लावून काम केले. पाच वर्ष ज्यांच्या पुढे मागे राहिलो. त्यांच्यासाठी रात्रीचा दिवस केला. पण या नेत्यांना जेव्हा एखादा कार्यकर्ता आमदारकी लढवण्यासाठी इच्छुक आहे असे कळते. तेव्हा हेच नेते आपल्याला धमकी देतात. तिकीट तुम्हालाच मिळणार आहे. निदान एखादा कार्यकर्ता इच्छुक आहे. तेवढे तरी राहू द्या. असे म्हणण्या इतपत या नेत्यांचे मन मोठे नसेल तर मग जनता जनार्दनाचे आशीर्वाद पाठीशी असताना कशाची भीती मनात ठेवायची असे म्हणत माजी नगरसेवक अमोल बालवडकर यांनी उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या विरोधात कोथरूडमध्ये दंड थोपटले.



कोथरूड विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी रविवारी (दि.६) जनआशिर्वाद मेळावा आणि दिवाळी सरंजाम वाटप कार्यक्रम घेण्यात आला. बालेवाडी येथील हायस्ट्रीट मैदानावर संपन्न झालेल्या या कार्यक्रमात तब्बल ४० हजार हून अधिक नागरिकांना दिवाळीनिमित्त सरंजाम वाटप करण्यात आले. या जाहीर मेळाव्यात बालवडकर म्हणाले, नुकतीच लोकसभा निवडणूक पार पडली. या लोकसभा निवडणुकीमध्ये मी पक्षाचे काम करण्यासाठी नागरिकांमध्ये जात होतो. त्यावेळी नागरिकांनी माझ्याकडे एक मागणी केली की, आता आपल्याला पुढे गेले पाहिजे. जसे जसे मी नागरिकांशी संवाद साधत होतो. त्या त्या वेळी नागरिक माझ्याकडे हीच मागणी करत होते.

नागरिकांचे अनेक प्रश्न आहेत. ज्या प्रश्नांची सोडवणूक मी करू शकतो असे नागरिकांना वाटत होते. त्यामुळे त्यांच्याकडून अशी अपेक्षा व्यक्त होणे साहजिक होते. पुढे जाऊन कार्यकर्त्यांकडूनही अशी मागणी होऊ लागली की, आता आपण पुढे गेले पाहिजे. गेली दहा वर्ष मी पक्षाचे काम करत आहे. पक्षाची ध्येयधोरणे, योजना तळागाळात पोहोचवण्यासाठी जीवाचे रान केले आहे. हे पक्षाला देखील माहित आहे.

जोपर्यंत मी नेत्यांचे काम करत होतो. त्यांच्या मागेपुढे करत होतो. तोपर्यंत माझ्याबद्दल त्यांना कुठलाही आकस नव्हता. पण ज्यावेळी नागरिकांची मागणी, कार्यकर्त्यांचा रेटा वाढू लागला. अशावेळी नागरिकांना बांधील राहून मी विधानसभेच्या निवडणुकीसाठी इच्छा व्यक्त केली. जसा मी इच्छुक झालो. तसा माझ्याबद्दल नेत्यांना आकस वाढला. माझ्या कार्यक्रमांना पक्षाच्या नेत्यांनी येणे टाळले.

कार्यकर्त्यांनाही माझ्या कार्यक्रमांना उपस्थित राहू नये अशा धमक्या देण्यात येऊ लागल्या. याही पुढे जाऊन मला पक्षातून काढून टाकण्याची धमकी दिली. पक्षावर माझा विश्वास आहे. परंतु नेत्यांना जर त्यांचा स्वार्थ कळत असेल तर एखाद्या कार्यकर्त्यांनी स्वार्थी झाले तर त्याच्याबद्दल लगेच कारवाई पक्ष करणार का असा माझा सवाल आहे. बालवडकर पुढे म्हणाले की आजच्या कार्यक्रमातून मी पक्षाला फक्त एवढेच सांगत आहे की, अजूनही वेळ गेलेली नाही.पक्षाने माझा विचार करावा मी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी कोथरूड मतदार संघातून इच्छुक असून पक्षाने जर मला उमेदवारी नाही दिली तर मग मला वेगळा विचार या जनतेसाठी घ्यावा लागणार असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

# महिलेवर हॉस्पिटलमध्ये बलात्कार

**बाणेर : येथील एका नामांकित हॉस्पिटलमध्ये महिलेवर सुपरवाइझरने बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पीडित महिला हॉस्पिटलमध्ये हाऊसकिपींगचे काम करते. याबाबत महिलेने सुरुवातीला हॉस्पिटलच्या सिक्युरीटी मॅनेजरकडे तक्रार केली होती. मात्र त्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले नाही. यानंतर पुढे या महिलेने चतुः श्रृंगी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दिली. याप्रकरणी, चतुःश्रृंगी पोलिसांनी सोमनाथ लक्ष्मण बेनगुडे (वय ४२, रा. तळेगाव दाभाडे पिंपरी-चिंचवड) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.**

बेनगुडे हादेखील हाऊसकिपींग सुपरवाझर म्हणून हॉस्पिटलमध्ये काम करतो. याबाबत २९ वर्षीय महिलेने फिर्याद दिली आहे. हा प्रकार जून २०२४ रोजी हॉस्पिटलमधील रेडीएशन डिपार्टमेंटच्या चेंजिंग रूममध्ये घडला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बाणेर परिसरात हे हॉस्पिटल आहे. तेथे फिर्यादी महिला एका खासगी एजन्सीजच्या माध्यमातून हाऊसकिपींगचे काम करते. तर आरोपी बेनगुडे हादेखील सुपरवाझरचे काम करतो. फिर्यादी महिला ही तिच्या पतीपासून विभक्त राहते.

मागील चार वर्षांपासून त्या हॉस्पिटलमध्ये काम करते. २९ जून रोजी त्या नेहमीप्रमाणे कामावर आली होती. कामाची वेळ संपल्यानंतर ती हॉस्पिटलच्या तिसऱ्या मजल्यावर खाली आली होती. या दिवशी तिला दुपारची शिफ्ट करण्यास सांगण्यात आले होते. तिला आरोपी बेनगुडे खाली भेटला. त्याने फिर्यादीला सांगितले की, रेडीएशन विभागात धूळ तशीच आहे ती जाऊन साफ कर. त्यानुसार फिर्यादी रेडीएशन ओन्कोलॉजी विभागात काम करण्यासाठी गेली.

सायंकाळी सहाच्या सुमारास फिर्यादी बेनगुडे तेथे आला. त्याने विभागाचा दरवाजा बंद केला. यानंतर फिर्यादीला जबरदस्तीने चेंजिंग रूममध्ये ढकलले. फिर्यादीनी त्याला विरोध केला. मात्र बेनगुडे याने तिच्यावर बलात्कार केला. झालेल्या प्रकारामुळे फिर्यादी घाबरून रडू लागली. त्या वेळी बेनगुडे याने याबाबत कोणाला काही सांगितले, तर तुला कामावर राहू देणार नाही, अशी धमकी दिली. फिर्यादी घाबरून घरी निघून गेली. दरम्यान, फिर्यादीवर कौटुंबिक जबाबदारी असल्यामुळे तिने याबाबत कोठे वाच्यता केली नव्हती. काही दिवसांनंतर तिने हॉस्पिटलच्या सिक्युरिटी मॅनेजरकडे तक्रार केली. त्यांनी फिर्यादीकडून तक्रार अर्जदेखील घेतला. मात्र पुढे काही झाले नाही, असे फिर्यादीने म्हटले आहे. त्यानंतर तिने चतुः श्रृंगी पोलिसात धाव घेत तक्रार दाखल केली. यानंतर पोलिसांनी आरोपी सुपरवाझर बेनगुडे याला अटक केली.

# गरजू विद्यार्थ्यांसाठी 'विनायक निम्हण गौरव शिष्यवृत्ती'; सनी निम्हण यांची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

दिवंगत आमदार विनायक निम्हण यांच्या व्दितीय स्मृतिदिनानिमित्त सोमेश्वर फाउंडेशनतर्फे ज्या पालकांची आर्थिक परिस्थिती बेताची असणाऱ्या गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना विनायक निम्हण गौरव शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. त्यासाठी विद्यार्थ्यांना १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंत अर्ज करता येणार असल्याची माहिती सनी विनायक निम्हण यांनी दिली.




यावेळी फाउंडेशनचे बिपीन मोदी, उमेश वाघ, अमित मुरकुटे, अनिकेत कपोते उपस्थित होते. मागील वर्षी या गौरव शिष्यवृत्तीद्वारे ३६८ गरजू व प्रतिभावान विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आल्याचेही निम्हण यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

निम्हण म्हणाले की, इयत्ता पाचवी व आठवी मध्ये शिष्यवृत्ती परीक्षेस बसलेल्या आणि काहीसे गुण कमी पडल्यामुळे शिष्यवृत्ती न मिळालेल्या विद्यार्थ्यांना उमेद न सोडता प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या प्रयत्नांचे कौतुक व्हावे यासाठी प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती देण्यात येते. डिप्लोमा, आयटीआय तसेच आर्टस, सायन्स, कॉमर्स, मेडिकल, इंजिनिअरिंग, आर्किटेक्चर, कृषी, फार्मसी, मॅनेजमेंट, लॉ, जर्नालिझम इत्यादी शाखांतील पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक निकष, नियम व अटीची पुर्तता करून गौरव शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

# पायलटच्या चुकीमुळेच हेलिकॉप्टर कोसळले

**पुणे । प्रतिनिधी**

बावधनजवळील लवळे परिसरात बुधवारी सकाळी दृश्यमानता शून्य असूनही पायलटने हेलिकॉप्टरचे उड्डाण केले. त्याला दिशेचा अंदाज आला नाही. त्याच्या चुकीमुळे बुधवारी ही दुर्घटना घडल्याचे हवाई वाहतूक क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे.

उड्डाणानंतर हेलिकॉप्टर तीन ते चार मिनिटांतच कोसळले. गुरुवारी सकाळी 'डीजीसीए' (नागरी वाहतूक महासंचालनालय) व 'एएआयबु' (एअर ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन युनिट) यांच्या पथकाने अपघातस्थळाची तसेच हेलिकॉप्टरने जेथून उड्डाण केले त्या ऑक्सफर्ड गोल्फ क्लबच्या हेलिपॅडची पाहणी केली. हेलिकॉप्टरच्या अवशेषांमधून 'फ्लाइट डेटा रेकॉर्डर' व 'कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर' ही दोन्ही उपकरणे ताब्यात घेऊन पथकातील तज्ज्ञ दुपारी दिल्लीला परत रवाना झाले.या दुर्घटनेत पायलटसह तीन जणांचा मृत्यू झाला. अपघाताचे नेमके कारण दोन उपकरणांच्या तपासणीतून कळेल, मात्र विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दृश्यमानता अजिबात नसल्याने पायलटला काहीच दिसले नाही. धुके हटल्यानंतर उड्डाण झाले असते तर दुर्घटना टळली असती. त्यामुळे हा अपघात पायलटच्या अर्थात मानवी चुकीमुळे झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# 'एनएमएमएस' परीक्षा २२ डिसेंबरला होणार

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी 'राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्ती योजना परीक्षा' (एनएमएमएस) २२ डिसेंबरला होणार आहे. शिष्यवृत्तीसाठी परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in आणि https://mscenmms.in या संकेतस्थळावर शाळांना ऑनलाइन अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या परीक्षेचा निकाल फेब्रुवारी २०२५च्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात जाहीर करण्यात येईल.

इयत्ता आठवीच्या आर्थिक दुर्बल घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने आर्थिक साहाय्य करावे, यासाठी २००७-०८ पासून ही शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येत आहे. याअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना इयत्ता नववी ते बारावीपर्यंत दरमहा एक हजार रुपये (वार्षिक १२ हजार रुपये) शिष्यवृत्ती देण्यात येते. आर्थिक दुर्बलतेमुळे प्रज्ञावान विद्यार्थ्यांची उच्च माध्यमिक स्तरापर्यंत होणारी गळती रोखावी, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. आर्थिक दुर्बल घटकातील पालकांचे उत्पन्न तीन लाख ५० हजार रुपयांपेक्षा कमी आहे, त्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते.

शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांची निवड लेखी परीक्षेमधून करण्यात येते. संबंधित लेखी परीक्षेतील गुणांच्या आधारे आणि राज्याने निश्चित केलेल्या मागासवर्गीयांसाठीच्या आरक्षणानुसार विद्यार्थ्यांची निवड करण्यात येते. परीक्षेसाठी बौद्धिक क्षमता चाचणी आणि शालेय क्षमता चाचणी हे दोन विषय असतील. ही परीक्षा मराठी, उर्दू, हिंदी, गुजराती, इंग्रजी, तेलगू आणि कन्नड अशा सात माध्यमांतून घेण्यात येणार आहे.

# कानगावात दरोडा टाकणाऱ्या दोघांना अटक

**दौंड । प्रतिनिधी**

कानगाव (ता.दौंड) येथील पाटस रेल्वे स्टेशन जवळील शेतामध्ये सशस्त्र दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या टोळीमधील दोघांना पोलिसांनी ग्रामस्थांच्या मदतीने अटक केली आहे. या दरोडेखोरांविरोधात यवत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.

सिद्धू रसिकलाल चव्हाण (रा.इनामगाव, ता.शिरूर) व बाबूशा गुलाब काळे रा.शेडगाव ता.श्रीगोंदा जि.अहमदनगर या दोघांना अटक करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की शनिवार (ता.४) रात्री साडेनऊच्या सुमारास काही सशस्त्र दरोडेखोर एका शेतात लपले असल्याचे एका शेतकऱ्याच्या निदर्शनास आले. संबंधित ग्रामस्थांने कानगाव मधील ग्रामस्थांना बोलावून घेतले. यावेळी ग्रामस्थांनी या दरोडेखोरांचा शेतात शोध घेतला. तेव्हा ते दरोडेखोर पळून जाऊ लागले. यावेळी एका दरोडेखोराला ग्रामस्थांनी पकडले. उर्वरित दरोडेखोर पळून जाण्याच्या तयारीत होते. यावेळी एका उसाच्या शेतातील पाचट जळत होते. याप्रसंगी जळत असलेले पाचट दरोडेखोरांनी उचलले आणि ग्रामस्थांना म्हणाले. आम्ही आमच्या दुचाकी जाळून टाकू व तुम्हाला गुंतवून टाकू अशी धमकी ग्रामस्थांना देत दरोडेखोरांनी दोन दुचाकी जाळल्या त्यानंतर दरोडेखोर पळून जात असताना दरोडेखोर व ग्रामस्थांमध्ये झटापटी झाल्या. यावेळी दरोडेखोरांनी त्यांच्या हातात असलेले कोयते ग्रामस्थांवर उगारले.

याबाबत पोलीस हवालदार कानिफनाथ पानसरे यांनी फिर्याद दिल्याने पाच दरोडेखोराविरुद्ध यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक सलीम शेख करीत आहेत.

# सरकारला घरी पाठवण्याची वेळ आलीय; खा.सुळे यांची राज्य सरकारवर टीका

पुणे । प्रतिनिधी

सध्या राज्यात महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. राज्याची आर्थिक स्थिती नाजूक आहे. संविधानिक पदावर असलेले नरहरी झिरवळ यांनी मंत्रालयात उडी मारुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. यावरुच आता सरकारला सत्तेत राहण्याचा अधिकार नाही. त्यांना घरी पाठविण्याची वेळ आली आहे, अशी टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.

पुण्यातील वाढत्या गुन्हेगारी घटनांबद्दल सुळे यांनी चिंता व्यक्त करीत या सर्व प्रकारास महायुतीचे सरकार जबाबदार आहे. पुण्यात गेल्या दोन दिवसांत मुलींच्या अत्याचाराच्या घटना उघडकीस येत आहे. यावरुन राज्य सरकारचा धाकच राहिला नाही. त्यामुळे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी सुळे यांनी केली.

फडणवीस यांनी हातात बंदूक घेऊन मतासाठी पोस्टरबाजी करणे चुकीचे आहे. त्यांना असे करायचे असेल तर बॉलीवूडमध्ये जावे. झिरवळ हे विधानसभेचे उपाध्यक्ष




आहेत. त्यांनाच असे करावेसे वाटणे म्हणजे सरकार जाण्याची वेळ आलेली आहे. सत्तेतील आमदाराला पक्ष सोडण्याची वेळ येते म्हणजे सत्ता जाण्याची, सरकार जाण्याची वेळ आली आहे. सत्तेतील आमदाराने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, ही गंभीर गोष्ट आहे, असे सुळे म्हणाल्या.

# बोपदेव घाट आत्याचार प्रकरणातील नराधम अद्यापही फरार; पोलिसांकडून २०० संशयितांची कसून चौकशी

**पुणे । प्रतिनिधी**

**बोपदेव घाटात तरुणीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अद्याप फरार आहेत. पोलिसांकडून आरोपींचा कसून शोध घेण्यात येत आहे. पोलिसांनी तीन हजार मोबाइलधारकांची माहिती संकलित केली असून, परिसरातील सीसीटीव्हीतील चित्रीकरण तपासण्यात येत आहे. या माहितीच्या आधारे तांत्रिक विश्लेषण करण्यात येत असून, दोनशेहून अधिक संशयितांची चौकशी करण्यात येत आहे.**




बोपदेव घाट परिसरात गुरुवारी (ता. ३) रात्री तरुणी मित्रासमवेत फिरण्यास गेली होती. त्यावेळी तीन आरोपींनी तरुणीसह तिच्या मित्राला कोयत्याचा धाक दाखवत बांबूने मारहाण केली. त्यानंतर आरोपींनी तरुणाला शर्ट आणि बेल्टने बांधून तरुणीवर लैंगिक अत्याचार केला. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेसह तपास पथकांकडून आरोपींचा माग घेण्यात आहे. या घटनेच्या कालावधीत बोपदेव घाटमार्गे प्रवास केलेल्या तीन हजार मोबाइलधारकांची माहिती पोलिसांनी संकलित केली आहे. या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या मदतीने तांत्रिक विश्लेषण सुरू आहे. तसेच, दोनशेहून अधिक संशयितांची चौकशी करण्यात येत असल्याची पोलिसांकडून देण्यात दिली.

श्वान पथकाची मदत

आरोपींचा शोध घेण्यासाठी श्वान पथकाची मदत घेण्यात येत आहे. पोलिसांच्या श्वान पथकाने घटनास्थळाचा शोध घेतला. त्याठिकाणी आरोपींनी तरुणाला मारहाण करण्यासाठी वापरलेला बांबू आणि रक्त आढळून आले. पोलिसांनी बांबू आणि रक्ताचे नमुने जप्त केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

cmyk